सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २७२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# इम्तियाज जलील यांच्या कारवर हल्ला

## छत्रपती संभाजीनगरात मोठा गोंधळ; पोलिसांचा लाठीचार्ज

एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांच्या वाहनावर हल्ला करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये इम्तियाज जलील यांच्या वहनावर हल्ला करण्यात आला आहे. जलील यांच्या वाहनावर हल्ला केल्यानंतर आता वातावरण चांगलंच तापलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजीनगरमध्ये इम्तियाज जलील यांचा प्रचार सुरू असतानाच ही घटना घडली आहे, त्यांच्या वाहनावर धारदार शस्त्रानं वार करण्याचा प्रयत्न झाला आहे. नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांच्या वाहनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे, महापालिका निवडणुकीत जुन्या कार्यकर्त्यांना डावलण्यात आलं. नव्या लोकांना संधी देण्यात आली, असा आरोप करत नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांच्या वाहनावर हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान एआयएमच्या नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांच्या वाहनावर हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे. महापालिका निवडणुकीत जुन्या कार्यकर्त्यांना डावलण्यात आलं, नव्यांना



संधी देण्यात आली, तसेच स्थानिक लोकांना देखील डावलण्यात आलं, असा आरोप या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे, त्यानंतर जलील यांच्या वाहनावर हल्ला करण्यात आला. यामुळे घटनास्थळी चांगलाच गोंधळ उडाला होता. त्यानंतर इम्तियाज जलील यांनी जिन्सी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

दरम्यान या घटनेनंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडाला, कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले. नाराज कार्यकर्त्यांनी गर्दी केल्यामुळे गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांना त्या ठिकाणी सौम्य लाठीचार्ज देखील करावा लागला. यामुळे वातावरण चांगलंच तापलं. या हल्ल्यामुळे महापालिका निवडणुकीच्या मतदानापूर्वी एमआयएममधील गटबाजी समोर आली आहे.

दरम्यान जलील यांच्या वहानावरील हल्ल्यापूर्वी त्यांना काळे झेंडे देखील दाखवण्यात आले होते, आणि त्यानंतर त्यांच्या वहानावर हल्ला झाला आहे. आज छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमची सभा होणार आहे. या सभेपूर्वीच हा हल्ला झाला आहे. या हल्ल्यानंतर सुरक्षेसाठी जलील यांना सुरक्षा रक्षकांनी घेराव घातला. कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत जलील यांच्या वहानावर हल्ला केला. दरम्यान या घटनेमुळे आता वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

# फडणवीसांच्या इशाऱ्यानंतर भाजप-एमआयएम युती तुटली

**अकोला :** राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी युती आणि आघाडी अंबरनाथ नगरपालिका आणि अकोल नगरपालिकेत झाली होती. मात्र, याबाबत वरिष्ठांना समजताच भाजप आणि काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठांकडून कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे, संबंधित स्थानिक नेत्यांकडून ही युती मागे घेतली जात असल्याचंही पाहायला मिळालं. अकोला जिल्ह्यात भाजप आणि एमआयएम यांच्यात युती झाली होती. मात्र, आता एमआयएम अकोटमधील भाजपच्या नेतृत्वाखालील 'अकोट विकास मंचा'तून बाहेर पडले आहे. तर, भाजप प्रदेशाध्यक्षांकडूनही विधानसभा आमदार प्रकाश भरसाखळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तर, अंबरनाथमधील भाजप नेते नरेंद्र पवार यांनी ही युती नसून काँग्रेसने भाजपला विकासासाठी समर्थन दिले आहे, तरीही पक्षाचा आदेश आम्हाला मान्य आहे, असे स्पष्टीकरण दिलं.

एमआयएमच्या अकोट नगरपालिकेतील पाचही नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी भाजपसमवेतच्या आघाडीतून बाहेर पडत असल्याचे पत्र दिले.




## थोडक्यात...

### अल्पवयीन ३७ जण आयएसआयच्या संपर्कात

**नवी दिल्ली :** पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयने १४ ते १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलांना आपल्या जाळ्यात अडकवलं आहे. सुरक्षा एजन्सीच्या तपासानुसार, ३७ हून अधिक अल्पवयीन मुलं पाकिस्तानच्या नेटवर्कचा भाग आहे. यामध्ये १२ पंजाब आणि हरियाणातील आहेत. जवळजवळ २५ मुलं जम्मू-काश्मीरचा भाग असल्याचं सांगितलं जात आहे. दोन दिवसांपूर्वी पठाणकोट पोलिसांनी १५ वर्षांच्या एका अल्पवयीन मुलाला अटक केलं. त्याच्या मोबाइलची तपासणी केल्यानंतर धक्कादायक प्रकार समोर आला. आयएसआय अनेक किशोरवयीन मुलांकडून ऑनलाइन माध्यमातून ब्रेनवॉश करीत स्वत:चं काम करवून घेत आहेत.

### वर्षभरात हजार बांगलादेशी हद्दपार

**मुंबई :** बांगलादेशी नागरिकांची राजरोस हिंदुस्थानात घुसखोरी होत आहे. अशा या घुसखोर बांगलादेशींविरोधात पोलिसांनी धडक मोहीम उघडली आहे. गेल्या वर्षभरात मुंबईतून एक हजार ६१ घुसखोर बांगलादेशींना शोधून त्यांना हद्दपार केले आहे. बांगलादेशी नागरिक मिळेल त्या मार्गाने भारतात घुसखोरी करत आहेत. विविध शहरांत पद्धतशीर सेटिंग लावून ते आसरा घेत आहेत. अशा बांगलादेशी घुसखोरांचा शोध घेऊन मुंबईसह महाराष्ट्र पोलिसांनी त्यांची हकालपट्टी करण्यास सुरुवात केली आहे.

### सायबर चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच

**पुणे :** शिवाजीनगर, कात्रज, बिबेवाडी, कोंढवा, पाषाणमधील नागरिकांनी गमावले सव्वा कोटी. शेअर बाजारातील गुंतवणुकीवर भरगोस परतावा घरातून ऑनलाईन कामाची संधी तसेच तातडीने कर्ज मिळवून देण्याचे आम्हीच दाखवून सायबर चोरट्यांकडून नागरिकांना गंडवण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. शहरातील शिवाजीनगर भवानी पेठ कात्रज बिबेवाडी कोंढवा आणि पाषाण मधील नागरिकांची सुमारे एक कोटी ३० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.

# वनक्षेत्र पेटवून देऊ अन् तक्रारदारालाच गुंतवू

**पंढरपुरात दोन वन अधिकाऱ्यांचे ऑडिओ व्हायरल**

**सोलापूर :** पंढरपूर तालुक्यातील खरातवाडी येथील राखीव वनक्षेत्राच्या प्रकरणात धक्कादायक आणि गंभीर प्रकार समोर आला आहे. दोन वनाधिकाऱ्यांमधील कथित ऑडिओ कॉल रेकॉर्ड सध्या पंढरपूर परिसरात मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये तक्रारदारालाच अडकवण्यासाठी थेट वनक्षेत्र पेटवण्याचा कट रचल्याचा आरोप होत असल्याने एकच खळबळ उडाली आहे.

खरातवाडी येथील राखीव वनक्षेत्रात झालेल्या कथित गैरप्रकारांविरोधात दादासाहेब चव्हाण यांनी वन विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतरच संबंधित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. त्यामध्ये दोन वनाधिकारी आपसात संभाषण करताना तक्रारदार दादासाहेब चव्हाण यांनाच अडकवण्याची योजना आखत असल्याचे ऐकू येत असल्याचा दावा केला जात आहे. आपणच वनपरिक्षेत्र पेटवून तक्रारदारालाच गोत्यात आणू, अशा आशयाचे संवाद या ऑडिओमध्ये असल्याचा आरोप आहे.

या कथित ऑडिओमुळे वन विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. वनसंरक्षणासाठी जबाबदार असलेले अधिकारीच जर तक्रारदारांविरोधात कट रचत असतील, तर सामान्य नागरिकांनी तक्रार करायची तरी कशी, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे हा कॉल रेकॉर्ड खरा असल्याचा दावा सोशल मीडियावर केला जात असला, तरी अद्याप अधिकृत स्तरावर त्याची सत्यता तपासली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणातील तक्रारदार दादासाहेब चव्हाण यांनी या संपूर्ण घटनेची गंभीर दखल घेण्याची मागणी केली आहे. संबंधित ऑडिओ क्लिपची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासाठी त्यांनी थेट राज्याचे वनमंत्री यांनी या प्रकरणात लक्ष घालावे, असे आवाहन केले आहे. या घटनेमुळे पंढरपूर तालुक्यात वन विभागाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत असून, येत्या काळात या प्रकरणावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'त्या' उमेदवारांची यादी मुख्यमंत्र्यांना सुपूर्द

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार राजकीय रिंगणात उतरल्याने प्रशासन सतर्क झाले असून, पोलिसांच्या दृष्टीने 'अॅक्टिव्ह' असलेल्या २० गुन्हेगार उमेदवारांची सविस्तर यादी मुख्यमंत्र्यांकडे सादर केली आहे. या उमेदवारांवर कडक नजर ठेवण्याचे आदेश देऊन पुणे पोलिसांनी विशेष पथकांची नेमणूक केली आहे. मुख्यमंत्री सोमवारी पुणे दौऱ्यावर असताना, पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी या गुन्हेगार उमेदवारांची यादी आणि त्यांची पार्श्वभूमी मुख्यमंत्र्यांना सविस्तरपणे 'ब्रीफ' केली.

# ठाकरे बंधुंचा जीव मुंबईतच अडकलाय : मुख्यमंत्री

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर निशाणा साधत राजकीय वातावरणात ठिणगी टाकली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे मुंबईबाहेर किती वेळा गेले आहेत? यांचा जीव फक्त मुंबईतच अडकला आहे आणि त्यामागे केवळ मुंबई महानगरपालिकेची तिजोरी हस्तगत करून भ्रष्टाचार करण्याचा हेतू आहे, अशी घणघाती टीका फडणवीस यांनी केली.



मुंबई महानगरपालिकेवर ताबा मिळवण्यासाठी दोन्ही ठाकरे गटांकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमागे जनसेवा नसून सत्ता आणि पैसा हेच मुख्य कारण असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. मुंबईबाहेरील महाराष्ट्राशी या दोन्ही नेत्यांना काहीही देणेघेणे नाही. त्यांना केवळ मुंबईत सत्ता हवी आहे जेणेकरून भ्रष्टाचाराचे जुने पर्व पुन्हा सुरू करता येईल, असे फडणवीस म्हणाले. मुंबईच्या विकासापेक्षा तिजोरीवर अधिक लक्ष असल्याचा आरोप करत त्यांनी ठाकरेंच्या राजकारणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्यावर विरोधकांकडून होणाऱ्या 'लोकशाही धोक्यात' असल्याच्या टीकेचाही फडणवीसांनी समाचार घेतला. उद्धव ठाकरेंवर प्रहार करताना ते म्हणाले, जेव्हा उद्धव ठाकरे स्वतः विधानपरिषदेवर बिनविरोध निवडून आले होते, तेव्हा लोकशाही कुठे गेली होती? तेव्हा त्यांना लोकशाहीचा विसर पडला होता का? स्वतःच्या सोयीनुसार लोकशाहीची व्याख्या बदलणाऱ्या नेत्यांनी भाजपला उपदेश देऊ नये, असा टोलाही त्यांनी लगावला.

मुंबईतील राजकारणात नेहमीच चर्चेत राहणाऱ्या 'मराठी विरुद्ध परप्रांतीय' या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंना थेट शब्दांत सुनावले आहे. जर उद्धव आणि राज ठाकरे मराठी आहेत, तर मी काय उत्तर प्रदेश किंवा पाकिस्तानमधून आलो आहे का? मी नागपूरचा आहे आणि मी सुद्धा मराठीच आहे, अशा शब्दांत फडणवीसांनी ठाकरेंच्या प्रादेशिक अस्मितेच्या राजकारणावर कडाडून हल्ला चढवला. मराठी अस्मितेचा मक्ता केवळ ठाकरेंकडेच नसल्याचे सांगताना फडणवीस यांनी आकडेवारीचा दाखला दिला. मुंबईत भाजप विधानसभेच्या १५ ते १६ जागा जिंकतो. जर आम्हाला मराठी माणसाची साथ नसती, तर हे यश शक्य झाले असते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'जवाहर नवोदय' प्रकरणी दोन महिला कर्मचाऱ्यांना पोलीस कोठडी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** जवाहर नवोदय विद्यालय, चिंचोलीरावwadी येथील अल्पवयीन विद्यार्थिनी कु. अनुष्का किरणकुमार पाटोळे हिच्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणी पोलिसांनी वसतिगृहातील दोन महिला कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, लातूर येथे गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या संवेदनशील प्रकरणाचा तपास अत्यंत गांभीर्याने, पारदर्शकपणे व कायद्याच्या चौकटीत करण्यात येत आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, मयत मुलगी जुलै २०२५ पासून जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता सहावीच्या वर्गात शिक्षण घेत होती आणि विद्यालयाच्या मुलींचे वसतिगृहात वास्तव्यास होती. प्राथमिक तपासात निष्पन्न झालेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपी पल्लवी सचिन कणसे, लता दगडू गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपींना दि. ९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. शाळा, वसतिगृह व संबंधित साक्षीदारांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात आले असून न्यायालयीन जबाब नोंदविण्याची कार्यवाही सुरू असून सीसीटीव्ही फुटेज, शाळेचे रजिस्टर, उपस्थिती नोंदी, कर्मचारी जबाब व इतर संबंधित कागदपत्रे हस्तगत करण्यात येत आहे.



# मनपाची सत्ता द्या.. लातूरचा चेहरा-मोहरा बदलू

## ▸▸ विलासराव देशमुख पक्षाच्या पलीकडचे नेतृत्व : मुख्यमंत्री फडणवीस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या हातात सत्ता द्या, लातूर शहराचा चेहरा - मोहरा बदलून टाकू असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या टाऊन हॉल मैदानावरील जाहीर सभेत बोलताना दिले. दिवंगत लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल बोलताना त्यांनी विलासराव देशमुख यांच्याबद्दल आपल्याला नितांत आदर ते पक्षाच्या पलीकडचे नेतृत्व होते, असे सांगितले.

लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप सर्वच्या सर्व ७० जागा स्वबळावर लढत आहे. या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या या विजय संकल्प सभेस पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. रमेशप्पा कराड. आ. अभिमन्यू कराड, माजी खासदार सुधाकर शृंगारे, बसवराज पाटील मुरूमकर, डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपचे संघटन सचिव कोडगे, शिवाजी




पाटील कव्हेकर, पाशा पटेल, अजित पाटील कव्हेकर यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातुरात बोलण्याच्या ओघात विलासरावांच्या आठवणी पुसून काढण्यासंदर्भात वक्तव्य केले होते. आजच्या सभेत त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेमके काय बोलणार ? याची प्रत्येक लातूरवासियाला उत्कंठा होती. भाजप प्रदेशाध्यक्षांची बाजू सावरून धरताना मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास केला गेल्याचे सांगितले. लातूरने राज्याला नेतृत्व देण्याचे काम केले आहे. विलासराव देशमुख, गोपीनाथराव मुंडे या नेत्यांच्या स्मरण कोणालाही झाल्याशिवाय राहत नाही. नुकतेच आपल्यातून निघून गेलेले केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांच्यासारखे नेते आजच्या राजकारणात विरळच असेही त्यांनी सांगितले. लातूरच्या या मातीत नेतृत्व तयार करण्याचा गुण असल्याचे ते म्हणाले.

लातूरच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी सरकारने २५९ कोटींची योजना कार्यान्वित केली असून त्याचे पहिल्या टप्प्यातील २२ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्याच्या दुसऱ्या टप्प्याला निवडणुकीनंतर मान्यता दिली जाणार आहे. मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने आलेल्या प्रचार सभेत बोलताना आपण कोणावरही टीका करायला आलेलो नाही तर विकासाबद्दल बोलायला आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

लातूरच्या नागरी समस्यांची सोडवणूक करण्यास आपण प्राधान्य देणार आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, कचऱ्याचा, वाहतुकीचा प्रश्र्न सोडवण्यास कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चारही फडणवीस यांनी केला. सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या आरोग्यदायी योजनेची माहिती देताना आता पाच लाखांऐवजी ३५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत केले जाणार असल्याचे सांगितले. लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतुकीची कोंडी कमी करून चौकाचे सुशोभीकरण केले जाईल. लातूरच्या लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्र्न सोडविण्यास प्राधान्य देऊ, एवढेच नव्हे तर राज्य सरकारच्या वतीने लातूर मनपात शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक तयार करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. शासनाच्या वतीने राबविण्यात येणारी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे सांगतानाच 'लखपती दीदी' योजना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री भोसले, संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, पाशा पटेल, गोविंद केंद्रे, शैलेश लाहोटी, यांसह अनेक नेत्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नगरपालिका निवडणुकीत विजयी झालेले निलंग्याचे नगराध्यक्ष संजय हलगरकर, रेणापूरच्या नगराध्यक्ष शोभाताई आकनगिरे, उदगीरच्या नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे व अहमदपूरचे नगराध्यक्ष स्वप्नील व्हत्ते यांच्या हस्ते मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.या सभेस गणेश हाके, दिलीपराव देशमुख, राहुल केंद्रे, शैलेश गोजमगुंडे, अ‍ॅड. रुद्राលीताई पाटील चाकूरकर, गुरुनाथ मगे, सुधीर धुत्तेकर, अविनाश कोळी, ओम धरणे, निखील गायकवाड, अमोल निडवदे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहीदी समागम कार्यक्रमाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** येत्या २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाविषयी लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागासह वाड्या-तांड्यावर जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. या अनुषंगाने राज्य शासनाकडून प्राप्त सूचनांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा त्यांनी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत तयार करण्यात आलेला माहितीपट जिल्ह्यातील शाळांमध्ये दाखविला जावा. तसेच या विषयावर आधारित निबंध लेखन, प्रश्र्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करावे. ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या नागरिकांपर्यंत या कार्यक्रमांची माहिती पोहोचणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जनजागृती मोहीम हाती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या.

नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमाला शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव समाजातील भाविक नांदेड येथील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यावर राहणाऱ्या या भाविकांना नांदेड येथे जाणेकरिता वाहतूक सुविधा अथवा इतर वस्तू स्वरुपात मदत करण्यासाठी इच्छुक व्यक्तींनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची मातोश्री वृद्धाश्रमास भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** नुकतेच एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक विभागातील विद्यार्थ्यांनी मातोश्री वृद्धाश्रमास भेट दिली. ही भेट विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता तसेच मानवी मुल्यांची ओळख व्हावी या हेतूने आयोजित केली होती.

या वेळी विभागप्रमुख डॉ. एन.एम. हलगरे, प्रा. श्रीकांत तांदळे, प्रा. नंदकिशोर धाराशिवे, प्रा. मनिषा बिडवे, प्रा. सायली देशमुख तसेच विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वृद्धांशी संवाद साधून मूलभूत मानवी मूल्यांचा शोध घेतला. मातोश्रीचे सदस्य प्रा. चव्हाण यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले व दिलखुलास संवाद साधला.




## मोफत आरोग्य शिबिरात ५०० रुग्णांची तपासणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** लातूर शहरातील अंबाजोगाई रस्त्यावरील के.जी.एन. हॉस्पिटलच्या डॉ. रजिया शेख यांच्या स्मृतिदिनानिमित्त केजीएन हॉस्पिटल व नोबल सामाजिक विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने इस्लामपुऱ्यातील रजिया क्लिनिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरात ५०० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले.

केजीएम हॉस्पिटलच्या माध्यमातून स्व. डॉ. रजिया शेख यांनी अनेक गरीब व गरजू रुग्णांची सेवा करण्याचे काम केले आहे. त्यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून डॉ. अमीर शेख यांच्या पुढाकारातून आयोजित या शिबिरात डॉ. अमीर शेख, डॉ. चांद पटेल, डॉ. खय्यूमअली, डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. मुख्तदिर सत्तारी, डॉ.असद खान, डॉ. मुशीरशेख, डॉ. राघवेंद्र देशमुख, डॉ. झिया सिद्दीकी, डॉ. इमरान जमादार, डॉ. इमरान खुरेशी, डॉ. अय्याज शेख, डॉ. अजीम मशायक, डॉ. सादिया शेख, डॉ. निहाल सिकंदर, डॉ. फिरदौस शेख, डॉ. अलिया मजकोरी, डॉ. अंजुम आरामुल्ला यांनी रुग्णाची तपासणी व उपचार केले.

## सौ. केशरबाई भार्गव विद्यालयात कला उत्सव

सौ. केशरबाई भार्गव प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन - कला उत्सव




२०२६ अत्यंत उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मुग्धा पोतदार तर अध्यक्षस्थानी कुमुदिनी भार्गव उपस्थित होत्या. श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांचा ही यथोचित सन्मान केला. मंचावर या सर्व मान्यवरा समवेत संस्था सचिव अ‍ॅड. आशिष बाजपाई, सूर्यप्रकाश धूत, शांतीलाल कुचेरिया, शरद नावंदर, शालेय समिती अध्यक्ष कमलकिशोर अग्रवाल, आनंद लाहोटी, सुहास शेट्टी आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. फॅमिली थीम, स्पोर्ट्स थीम, चांद्रयान, शिव-संभाजी छावा नृत्य, रामायण थीमवर आधारित नृत्य, वारकरी दिंडी, देशभक्तीपर गीत-नृत्य तसेच लहान मुलांच्या रंगतदार नृत्यांनी संपूर्ण सभागृह टाळ्या च्या गजराने दुमदुमून गेले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौं सुनीता रणदिवे यांनी तर सूत्रसंचालन स. शि.कल्पना श्याम भट्टड व रेश्मा अडाणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सलगरे मॅडम यांनी आभारप्रदर्शन करून या रंगतदार कला उत्सव २०२६ ची सांगता केली.

## श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचा वर्धापनदिन उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** लातूरच्या सर्वांगीण जडणघडणीत येथील श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचा वाटा लक्षणीय असल्याचे गौरवोद्गार चाकूर येथील बीएसएफच्या महानिरीक्षक विनितकुमार शर्मा यांनी काढले.

लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचा ८६ वा वर्धापन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राजस्थान विद्यालयाच्या भव्य प्रांगणावर आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास संबोधित करताना शर्मा आपले मनोगत व्यक्त करता होते. मंचावर संस्थेच्या विश्र्वस्त मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, संस्थेचे अध्यक्ष शैलेशकुमार लाहोटी, सचिव एड.आशिष बाजपाई, शालेय समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कर्वा , श्रीमती कुमुदिनी भार्गव , आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिमाखदार पथसंचलन करत विनितकुमार शर्मा यांना मानवंदना




दिली. अतिशय शिस्तबद्ध मानवंदनेने उपस्थितांच्या डोळ्याचे अक्षरशः पारणे फेडले. या शिस्तबद्ध परेडचे कौतुक करून महानिरीक्षक विनितकुमार जैन पुढे म्हणाले की, या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण अतिशय उच्च दर्जाचे असून त्यामुळे सर्वंकष विद्यार्थी घडविण्याचे काम येथे केले जाते. शिक्षण क्षेत्रातील लाहोटी परिवाराचे योगदानही अतुलनिय असे आहे.

संस्थेचे अध्यक्ष शैलेशकुमार लाहोटी यांनी आपल्या मनोगतात श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेने लातूरच्या शिक्षण क्षेत्रात अतिशय उत्कृष्ट कार्य केले आहे. भविष्यात संस्थेच्या माध्यमातून यापेक्षाही अधिक चांगले कार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यावर कायम भर दिला जात असल्याचे सांगून त्यांनी वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या विविध

**लातूरच्या सर्वांगीण जडणघडणीत लातूरच्या मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचा वाटा लक्षणीय : विनितकुमार शर्मा**

पुरस्कार विजेत्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

संस्थावर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेतील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी परेड संचलन, मानवंदना, स्वागतगीत याचे सादरीकरण केले . या प्रसंगी संस्थेकडून दरवर्षी दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार, उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार यांचे वितरण करण्यात आले. शिवाय मागील वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे एड. आशिष बाजपाई यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या कार्याचा संक्षिप्त आढावा सादर केला. संस्थेच्या विकासात स्व. विष्णुदास राठी, स्व. रामगोपाल राठी, स्व. रणछोडदास उक्का, स्व. प्रभुदास वोरा, स्व. पुरणमल लाहोटी, स्व. नारायणलालजी लाहोटी यांचे लाभलेले योगदान कदापि विसरण्याजोगे नसल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती सुवर्णा डोईजोडे, श्रीमती योगिता घुगे यांनी तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत कर्वा यांनी केले.

याप्रसंगी आनंद लाहोटी, सूर्यप्रकाश धूत, कमलकिशोर अग्रवाल, डॉ. संजय शिवपुजे, डॉ. भोसले, डॉ. अनिल राठी, बालकिशन बांगड, संजय बियाणी, राजेंद्र मालपाणी, सुहास शेट्टी, शरदकुमार नावंदर, वंदना बियाणी, शिवाजी नरहरे, अ‍ॅड. श्रीकांत उटगे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा परीक्षा रविवारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ७ जानेवारी :** महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ रविवार, ११ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत एक सत्रामध्ये परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. ही परीक्षा लातूर जिल्ह्यातील १४ उपकेंद्रावर ही परीक्षा आयोजित केली आहे. त्यामुळे परीक्षा कालावधीत परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी व्यतिरिक्त पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल.

## थोडक्यात...

### सुशीलाबाई इंगळे यांना आण्णाभाऊ साठे समाजरत्न पुरस्कार जाहीर



**सोयगाव :** तालुक्यातील गलवाडा येथील सामाजिक महिला कार्यकर्त्या ग्रुप ग्रामपंचायत गलवाडा (अ) सदस्या सुशीलाबाई चंद्रकांत इंगळे यांना अनश्री-धनश्री फाउंडेशन सोलापूर येथील यंदाचा मानाचा अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. जत तालुक्यातील प्रसिद्ध समाजसेवक ए.एस.गोरड यांच्या सयुक्त विद्यमानाने हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराबद्दल विविध स्तरातून त्यांना अभिनंदन शुभेच्छा दिल्या जात आहे.

### ब्लू माउंटन प्री-स्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू माउंटन प्री-स्कूलचे ७ वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्सव शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वेंकट मैलापुरे तर विशेष पाहुणे म्हणून बिडकीन पोलीस सहायक निरीक्षक निलेश शेळके उपस्थित होते. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे मा. डॉ. वेंकट मैलापुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत शिस्त, संस्कार व मेहनतीची सवय अंगी बाणवण्याचे महत्त्व सांगितले.

### एमजीएममध्ये आज महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञान, तत्त्वज्ञान आणि सद्य:स्थिती' या विषयावर गुरूवार, दिनांक ८ जानेवारी २०२६ ते शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ या कालावधीत तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमच महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे वार्षिक अधिवेशन आयोजित होत आहे. तत्त्वज्ञान, विज्ञान आणि समाज यांतील संवाद अधिक सशक्त करण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची ठरणार असून देशभरातील अभ्यासक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी व तत्त्वज्ञानप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, परिषद अध्यक्ष डॉ.सुनीलदत्त गवरे, परिषद कार्यकारी अध्यक्ष डॉ.अमन बगाडे व रामेश्वर कनसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### फर्दापूर येथे बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिना निमित्ताने शाळेत कार्यक्रमाचे आयोजन

**फर्दापूर :** जिल्हा परिषद शाळा व माणिकराव पालोदकर विद्यालयात दर्पण कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिना निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी माणिकराव पालोदकर विद्यालयात दर्पण कार दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच शिक्षक व शिक्षिका यावेळी उपस्थित होते. यावेळी फर्दापूर येथील पत्रकार शिवाजी महाकाळ, रमेश पाटील,जगन शिंदे, दिपक बंलाडे, इब्राहिम शेख, रब्बानी शेख, सागर बिरारे, शेख अजहर यांचे शाळे मार्फत शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

### विराटला अपमानित करून संजयची बाजू

**मुंबई :** सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)ची गोष्ट सांगितली आहे. अन्विता आता केवळ जगण्याचा नाही, तर स्वतःच्या जीवनाचा विचार करू लागली आहे. संजय (ऋषी सक्सेना) च्या मनातील वाढती असुरक्षितता आणि विराटच्या (रजत वर्मा) वागण्याचा उलगडा होत नसल्याने तिची स्थिती गोंधळलेली आहे. त्यातच रजतचे वडील राजनाथ वर्मा (फारूख सईद) यांच्या आग्रही स्वभावामुळे गुंतागुंत आणखी वाढली आहे. अन्वितावर निवड करण्याची पाळी आली आहे आणि त्यात तिच्या सक्षमतेची आणि नात्यांची परीक्षा होणार आहे.

### कॅनरा रोबेको सेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ('कॅनरा रोबेको एएमसी') तर्फे 'निवेश बस यात्रा'

**छत्रपती संभाजीनगर :** कॅनरा रोबेको सेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने महाराष्ट्र व गोव्यामध्ये 'निवेश बस यात्रा' सुरू केली आहे. ज्याअंतर्गत म्युच्युअल फंड गुंतवणूकीबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यात येईल आणि राज्यभरातील गुंतवणूकदारांना शिक्षित करण्यात येईल.या उपक्रमाचा म्युच्युअल फंड गुंतवणूक सोपी करण्याचा आणि राज्यांमध्ये आर्थिक शिक्षण देण्याचा मनसुबा आहे. एक बस महाराष्ट्रातील पुण्यापासून प्रवासाला सुरूवात करेल, ज्यानंतर नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला व नागपूर यांसह प्रमुख ठिकाणांपर्यंत प्रवास करत शहरांमधील निवासींमध्ये जागरूकतेचा प्रसार करेल. दुसरी बस कोल्हापूरमधून प्रवासाला सुरूवात करेल आणि गोव्यामध्ये या उपक्रमाचे समापन होईल.

### झिरो-फॉरेक्स डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड लॉन्च

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज झिरो-फॉरेक्स डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड लाँच करण्याची घोषणा केली. ही प्रीमियम ट्रॅव्हल आणि लाइफस्टाइल ऑफर प्रामुख्याने श्रीमंत जागतिक प्रवाशांसाठी आहे ज्यांना झिरो फॉरेक्स मार्कअप, ट्रॅव्हल लाउंज, ॲक्सिलरेटेड ट्रॅव्हल रिवॉर्ड्स आणि लाइफस्टाइल विशेषाधिकारांचा प्रस्ताव मिळवायचा आहे. आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या क्रेडिट कार्ड्स, फास्टॅग आणि लॉयल्टीचे प्रमुख शिरीष भंडारी म्हणाले,डायमंड रिझर्व्ह हा आंतरराष्ट्रीय प्रवासाचा अनुभव असलेल्या ग्राहकांसाठी एक आदर्श पर्याय आहे, ज्यांना परदेशात आणि भारतातही अखंडपणे काम करणारे प्रीमियम कार्ड हवे आहे. शून्य फॉरेक्स मार्क-अप, मजबूत प्रवास-नेतृत्व बक्षिसे प्रस्ताव आणि ६ लाख खर्चावर वार्षिक शुल्क माफीसह, ते जागतिक प्रवास आणि जीवनशैलीसाठी एक नैसर्गिक साथीदार आणि प्राथमिक कार्ड बनते.

### सावरगाव जि.प. शाळेत सावित्रीबाई फुले जयंती

**कन्नड :** सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कन्नड तालुक्यातील नागापूर केंद्र अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावरगाव येथे कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्त्री शिक्षण व समाजप्रबोधनातील कार्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी प्रियल हिने सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारत त्यांच्या जीवनकार्यावर आधारित माहिती सादर केली. तिच्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक गोंडे, विनोद अंभोरे, योगेश राठोड, जगदीश कंचार, माणिक चव्हाण यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# रांजणगाव खुरी ग्रामपंचायतला ठोकले टाळे

## २० दिवसांपासून कामकाज बंद; नागरिकांची कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि ७ जानेवारी :** पैठण तालुक्यातील रांजणगाव खुरी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका बेबी राठोड यांच्या विरोधात ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी १७ डिसेंबर पासून कुलूप लावले आहे.

सरपंच, उपसरपंच सर्व ग्रामपंचायतचे सदस्य व ग्रामस्थांनी ग्रामसेविका बेबी राठोड यांची बदली करून त्यांच्या जागी नवीन नियुक्ती केलेल्या गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत अधिकारी साहिल शेख यांना तात्काळ रुजू करून रांजणगाव खुरी ग्रामपंचायत कार्यालय खोळंबलेली कामे सुरळीत राहण्यासाठी प्रशासकीय अधिकारी यांनी जातीने लक्ष देण्याची मागणी पंचायत समिती पैठण, छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सरपंच सुरेश भिसे, उपसरपंच जयश्री ढगे, सात ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी अनेक अर्ज, निवेदन देऊन केलेली आहे.

तरी अजून पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

> ग्रामसेविका बेबी राठोड यांचा मनमानी कारभार सुरू असून ग्रामपंचायतचे अनेक फाईल त्यांच्याकडेच आहे.नवीन नियुक्ती करण्यात आलेल्या ग्रामपंचायत अधिकारी साहिल शेख यांना दोन महिन्यापासून चार्ज देत नसून वरिष्ठांनी लक्ष देऊन राठोड यांच्या वर कठोर कारवाई केली पाहिजे असे सरपंच यांनी सांगितले.
>
> **- सुरेश भिसे**
> **सरपंच, रांजणगाव खुरी**



# टोंग वस्ती-जुने जामगाव रस्त्याचे भाग्य उजळणार

**आमदार प्रशांत बंब यांच्या विशेष प्रयत्नातून दहा कोटींच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि.७ जानेवारी :** तालुक्यातील टोंग वस्ती ते जुने जामगाव या अत्यंत महत्त्वाच्या व अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार प्रशांत बंब यांच्या विशेष प्रयत्नातून करण्यात आला. सुमारे दहा कोटी रुपयांच्या खर्चातून हा रस्ता विकसित केला जाणार असून त्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ८ कोटी २८ लाख ७ हजार रुपयांच्या निधीतून पाच किलोमीटर सिमेंट काँक्रीट रस्ता, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जवळपास पावणेदोन कोटी रुपयांच्या निधीतून एक किलोमीटर डांबरी रस्ता व पुलाचे काम करण्यात येणार आहे. या सर्व कामांचे उद्घाटन सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी आमदार प्रशांत बंब आणि भाजपचे ज्येष्ठ नेते किशोर धनायत यांच्या हस्ते करण्यात आले.



या रस्त्याच्या कामामुळे टोंग वस्ती, जुने जामगाव, कायगाव परिसरातील शेती, दळणवळण, आरोग्य व दैनंदिन जीवनाला मोठी चालना मिळणार असून शेतकऱ्यांसाठी हा रस्ता नवसंजीवनी ठरणार आहे.

यावेळी भाजप तालुका अध्यक्ष सुरेश शिंदे, संपत रोडगे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे शाखा अभियंता सचिन खाजेकर, कॉन्ट्रॅक्टर विजय अरोरा, प्रकल्प अधिकारी विलास खर्डीकर, गणेश चव्हाण, डॉ. गोरख तुपलोंढे, मेहबूब पटेल, अशोक महाराज माने, गणेश तागड, अनिल मेहेरे, राजू रासने, रामदास माने, भाऊसाहेब गवळी, योगेश चव्हाण, हिरालाल मेहेरे, रामेश्वर पवार, ज्ञानेश्वर दहीतुले, रविंद्र तागड, बाळकृष्ण मोहीम, विजय मेहेरे, रफिक पटेल, उसेन पटेल, नजीर शेख, बाबासाहेब शिंदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रस्त्याच्या उद्घाटनानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयक्षम नेतृत्वामुळे राज्यात विकासाला गती मिळाली आहे. गावागावात दर्जेदार रस्त्यांचे जाळे उभारून गावांना मुख्य रस्त्याशी जोडण्याचे काम मतदारसंघात सातत्याने सुरू आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले.

### एमजीएममध्ये 'विकसित भारत युथ कनेक्ट' कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर, दि. ७ :** महात्मा गांधी मिशन स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसच्यावतीने आज द्योतन सभागृह येथे 'विकसित भारत युथ कनेक्ट' या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. विकसित भारताच्या संकल्पनेत युवकांचा सक्रिय सहभाग वाढवणे व राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी कार्यक्रम संचालक डॉ. एस. आर. होळकर, प्राचार्य डॉ. संजय गुड्डेटवार, समन्वयक केतकी मुगले, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

# एमजीएमतर्फे युवा संशोधक अर्णव महर्षी याचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ७ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्यावतीने १७ वर्षीय युवा संशोधक अर्णव महर्षी याचा विशेष सन्मान करण्यात आला. अर्णवने केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधनाबद्दल तसेच त्याला मिळालेल्या प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराबद्दल विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांनी अर्णव व त्याची आई डॉ.अनुप्रिया महर्षी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सन्मान कार्यक्रमासाठी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांच्यासह एमजीएमचे सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व अन्य मान्यवर उपस्थित होते.



अर्णव महर्षी याने स्वतःच्या आयुष्यातील मोठ्या संघर्षांना संधीमध्ये रूपांतर करत समाजोपयोगी नवकल्पना विकसित केल्या आहेत. २०२२ मध्ये झालेल्या एका गंभीर अपघातानंतर तो कोमामध्ये गेला होता व उजव्या बाजूला पूर्णतः पक्षाघात झाला होता. सलग दोन वर्षांच्या कठोर फिजिओथेरपीनंतर त्याने केवळ हालचाल क्षमता परत मिळवली नाही तर ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी कमी खर्चिक पुनर्वसन तंत्रज्ञान विकसित केले.

अर्णवचे पहिले संशोधन म्हणजे पक्षाघातग्रस्त रुग्णांच्या ग्रॉस-मोटर रिहॅबिलिटेशनसाठी उपयुक्त असे मनगटावर घालता येणारे पेटंट व कॉपीराईटयुक्त उपकरण होय. यामुळे रुग्णांच्या सामाजिक समावेशासही मदत होते. याशिवाय त्याने फेअर चान्स (फाईन-मोटर आर्टिफिशियल इंटेलिजन्स असिस्टेड रिहॅबिलिटेशन चान्स) नावाचे एआय आधारित ॲप विकसित केले आहे. या संशोधनाला आयआयटी बॉम्बे टेकफास्ट २०२४ मध्ये इंटरनॅशनल इनोव्हेशन अवॉर्ड मिळाला असून वर्ल्ड डिसॅबिलिटी अँड रिहॅबिलिटेशन कॉन्फरन्स २०२५ मध्ये त्याचा शोधनिबंध सादर करण्यात आला आहे.

# आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. ७ :** सिल्लोड येथिल आ. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात आमदार अब्दुल सत्तार यांनी पत्रकारांशी संवाद साधत समाजात सत्य, पारदर्शकता आणि लोकशाही मूल्ये जपण्यामध्ये पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास कृउबा समितीचे सभापती विश्वास दाभाडे, संचालक नंदकिशोर सहारे, दामूअण्णा गव्हाणे, दुर्गाबाई पवार, किशोर अग्रवाल, सुदर्शन अग्रवाल त्यांच्यासह पत्रकार मन्सूर कादरी, शिवाजी डापके, प्रकाश वराडे, प्रशांत क्षीरसागर, शाम पुरे, सचिन चोबे, जावेद सौदागर, सोहेल कादरी, शब्बीर पटेल,संजय कुलकर्णी, निलेश सोनटक्के, आझम पठाण, सय्यद तौसिफ, रवी सोनवणे, चांद देशमुख, जी. टी. वाघ, गजानन काकडे, विलास नरवडे, दत्ता ढोरमारे, विजय वाकेकर, गजानन मरकड, अनिल कुलकर्णी, शेख इस्माईल, सय्यद हारून, राजेंद्र साठे, शाम ठाकूर, अन्सार मौलाना, रवींद्र ठाकूर, आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.



# महिलेस जातीवाचक शिवीगाळ; ॲट्रॉसिटीचा गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. ७ जानेवारी :** शहरातील ब्राम्हणी गराडा रोड परिसरात एका महिलेस जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी आरोपीविरुद्ध अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ०२ जानेवारी रोजी सायंकाळी ब्राम्हणी गराडा रोडवरील एका किराणा दुकानात महिला सामान खरेदीसाठी गेली असता, तेथे आलेल्या राजू केवट (रा. शिवनगर) याने महिलेस अर्वाच्य व जातीवाचक शब्दांत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. यानंतर दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी कन्नड शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री करीत आहेत.

# आ. सत्तारांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.७ जानेवारी :** सिल्लोड-सोयगावचे माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त नॅशनल मेडिकल कॉलेज,सिल्लोड तर्फे मोफत आरोग्य शिबीर ग्रामीण रुग्णालय सोयगांव येथे आयोजित करण्यात आले.या शिबिरासाठी आजूबाजूच्या गावातील बहुसंख्य नागरिकांनी हजेरी लावून आपल्या आजाराचे निदान केले.



आरोग्य शिबिराचे उद्घाटन उपजिल्हाप्रमुख प्रभाकरराव (आबा) काळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी नगराध्यक्षा आशाबी तडवी, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य रमेश गव्हाडे, नगरसेवक तथा सोयगाव शहर प्रमुख संतोष बोडखे, गटनेता अक्षय काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव, नगरसेवक हर्षल काळे, कदीर शहा, गजानन कुडके, लतीफ शहा, संध्याताई मापारी, ध्रुपताबाई सोनवणे, सुरेखा तायडे, ॲड.योगेश पाटील, अमोल मापारी, समाधान काळे, शेख बबलू, संदीप चौधरी, प्रताप जाधव, किशोर मापारी, विनोद राठोड, सुनील निकम, भारत तायडे, नॅशनल मेडिकल कॉलेजचे डॉ. अहेमद शरीफ देशमुख, डॉ. अक्षय झवर, डॉ. अमन शहा, डॉ. रेणुका पायघन, डॉ. सना शेख, डॉ. दिव्या खोमणे, नंद वराडे, कविता टोम्पे, शितल शिंदे, अर्चना सपकाळ, दिव्या गायकवाड, अश्विनी दुधे, दीपाली राऊत, मनिषा बकले, जयश्री बकले, प्रतीक्षा गोफणे, कीर्ती गवई, भारती सुरे, जया अंदुरे, मुस्कान बेगम, कविता बकले, मिलिंद अहिरे, अभिजित बोर्डे, अभिषेक गाडेकर, शेख हुजेफ, मरिअम सैय्यद, अरबाज पठाण, अफरोज शेख आदीं सह उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. / ७६६ / २०२५
पु.ता.०९/०२/२०२६
अर्जदार:-१. नसिर शानुर शेख वय ६२ वर्ष धंदा. शेती रा. शिंगी, ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर
२). रुक्सानाबी शब्बीर पठाण वय ५२ वर्ष धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर
विरुद्ध:
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की, असे की, असे की, अर्जदार नं. १ आणि २ यांचे वडील नामे शानुर चंदु शेख हे दि. ०३/०३/२०१६ रोजी मौजे शिंगी ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत त्याच प्रमाणे मयत शानुर चंदु शेख यांची पत्नी तसेच अर्जदार नं. १ आणि २ यांची आई नामे सुगराबी शानुर शेख हया देखील त्यापूर्वी मौजे शिंगी ता. गंगापूर येथे दि. ०८/११/२०१० रोजी मयत झाले असल्याने अर्जदार यांच्या शिवाय मयत शानुर चंदु शेख व मयत सूगराबी शानुर शेख यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही.असे की, मयत शानुर चंदु शेख व मयत सूगराबी शानुर शेख हे दोन्ही शेतमजूर होते व अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत शानुर चंदु शेख व मयत सूगराबी शानुर शेख यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की मयत शानुर चंदु शेख व मयत सूगराबी शानुर शेख यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत शानुर चंदु शेख व मयत सुगराबी शानुर शेख यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

**कनिष्ठ लिपिक**
**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.१४/२०२६
अर्जदार:१) गंगाबाई भ्र. बाबुराव सुरळे रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापूर २) कृष्णा पिता बाबुराव सुरळे रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापूर ३) राजेंद्र पिता बाबुराव सुरळे रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापूर ४) विजय पिता बाबुराव सुरळे रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापूर ५) संजय पिता बाबुराव सुरळे रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापूर ६) संतोष पिता बाबुराव सुरळे रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापूर
// विरुध्द//
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण:- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

ज्या अर्थी वरील अर्जदारांनी डहोकेट डी. व्ही. साबणे यांचे मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे कि, मयत बाबुराव दगडू सुरळे हे तुर्काबाद खराडी ता. गंगापूर येथील रहिवाशी होते ते दिनांक २२/०५/२०१० रोजी राहते घरी अर्धांगवायू झाल्याने अल्पशा आजाराने मयत झाले असून अर्जदार क्र. १ या त्यांच्या पत्नी आहे व अर्जदार क्र. २ ते ६हि त्यांची मुले आहेत मयत बाबुराव दगडू सुरळे यांना अर्जदार क्र १ ते ६ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयत बाबुराव दगडू सुरळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार हेच मयत बाबुराव दगडू सुरळे यांचे कायदेशिर वारसदार आहेत. अर्जदार यांना शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत बाबुराव दगडू सुरळे यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकेट) ची आवश्यक असल्याने अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या मा. न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक ०७/०१/२०२६ रोजी दिले.

**लिपिक, सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, गंगापूर**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

सिव्हील एम. ए.नं. ८३१/२०२५.
पु.ता.२७/०१/२०२६
अर्जदार:-मच्छिंद्र रंगनाथ गाडेकर वय ६१ वर्ष धंदा. शेती रा. वाळुज बु. ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर
विरूद्ध :
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण :- कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,असे की, अर्जदार यांची आई नामे द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर हे दि. ३०/०३/२०२५ रोजी लखमापूर ता. गंगापूर जि. छ.संभाजीनगर येथे मयत झाले आहेत. मयत द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर यांचे पति व अर्जदार यांचे वडिल नामे रंगनाथ अंबादास गाडेकर हे देखील पूर्वीच दिनांक ११/१०/२०१३ रोजी मौजे लखमापूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर व मयत रंगनाथ अंबादास गाडेकर यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार है मयत मयत द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर व मयत रंगनाथ अंबादास गाडेकर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर व मयत रंगनाथ अंबादास गाडेकर याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर व मयत रंगनाथअंबादास गाडेकर यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना म मयत द्वारकाबाई रंगनाथ गाडेकर व मयत रंगनाथ अंबादास गाडेकर यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

**कनिष्ठ लिपिक, आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर**

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# चढता 'पारा' आणि घसरती 'पातळी'!

कृत्रिम बुद्धिमत्ता नावाच्या नव्या क्रांतीने जीवनाची सारी अंगे एवढ्या झपाट्याने ग्रासून टाकली आहेत की त्यामुळे एखाद्या प्रामाणिक वास्तवावरही प्रश्नचिन्हे उमटू लागली असून खोट्यावर मात्र लगेच विश्वास बसावा अशी वेळ आल्याचे दिसू लागले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे दुधारी हत्यार असून, त्याचा वापर विवेकाने झाला नाही तर त्यामुळे मोठी हानी होण्याची शक्यता आहे, असा इशारा या क्रांतीच्या पाऊलखुणा उमटत असतानाच अनेकांनी दिला होता. जगभरातील अनेक देशांत याची गांभीर्याने दखलही घेतली गेली होती आणि या शस्त्राचा वापर करण्यासाठी जगाने स्वतःवर काही नैतिक बंधने घालून घेतली पाहिजेत असा आग्रहदेखील झाला होता. त्याची गरज आता तीव्र होऊ लागली आहे. विशेषतः माध्यमविश्वात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढू लागल्यापासून माध्यमांच्या प्रतिष्ठेचा आणि प्रामाणिकपणाचा प्रश्नच ऐरणीवर येऊ लागला आहे आणि आपण जी माहिती प्रसृत करतो त्याचे स्रोत वास्तविक आहेत किंवा नाही हे शोधणे प्रत्यक्ष माध्यमांनादेखील अवघड होऊ लागल्याने आपल्या प्रतिष्ठेवरील प्रश्नचिन्हे पुसून टाकणेदेखील सोपे राहिलेले नाही. समाजमाध्यमांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा एवढा सुळसुळाट झाला आहे की या मंचावरून प्रसृत होणाऱ्या कोणत्याही बातमीवर किंवा माहितीवर अगोदर अविश्वासच दाखविला जाऊ लागला असून या माहितीची किंवा बातमीची शहानिशा केल्याखेरीज त्याची सत्यता स्वीकारण्याची मानसिकताच कमी होऊ लागली आहे. त्यामुळे, सामान्य समाजात गैरसमज पसरवून समाजाची फसवणूक करण्याकडेच या माध्यमांचा वापर होत असल्याचेही दिसू लागले आहे. संवैधानिक किंवा अधिकृत सत्तेच्या पलीकडे, आतून कार्यरत असलेल्या अदृश्य सत्ताकेंद्रांच्या कारवाया, म्हणजे ज्यास जगभर 'डीप स्टेट' असे म्हटले जाते, त्यांचा सत्तेवर अप्रत्यक्ष प्रभाव असतो, अशा संकल्पनेत कोणतेही निर्णय गुप्तपणे घेतले जातात व कोणते निर्णय कोण घेते हे कधीच समजत नाही. सामान्यांच्या जगात यास षडयंत्र असेही म्हटले जाते. डीप स्टेट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे असे हातात हात घालून चालणे सुरू झाल्यापासून षडयंत्रांची संकल्पना तंत्रज्ञानाशी जोडली गेली असून समाजमाध्यमांवर काय दिसावे, काय दाखविले जावे यावरही या संकल्पनेचा प्रभाव दिसू लागला आहे. जनमताची दिशा प्रभावित करण्यासाठी या संकल्पनेचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने, समाजमाध्यमांवरून प्रसारित होणाऱ्या बातम्या किंवा माहितीची विश्वासार्हता संपत चालली असून त्याचा फटका एकूणच माध्यमविश्वालाही बसू लागल्याने, माध्यमेदेखील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर परसरविल्या जाणाऱ्या संभ्रमाचे बळी ठरतील अशी भीती दिवसेंदिवस गडद होत चालली आहे. म्हणूनच, आजकाल माध्यमविश्वातील मुख्य प्रवाहांकडून कमाल सावधगिरी बाळगली जात असावी.

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात, विशेषतः महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत, प्रचाराचा पारा तापलेला असताना, प्रचाराची पातळी मात्र घसरत चालली असून, त्यात भर म्हणून समाजमाध्यमांवरून पसरणाऱ्या माहितीबाबतही असेच काहीसे होऊ लागले आहे. अन्यथा, ज्या बाबींची स्पष्ट शहानिशा करणे अनेक मार्गांनी सोपे आणि शक्य असते, अशा माहितीची जबाबदारी घेण्याऐवजी त्याच्या सत्यासत्यतेच्या खात्रीपासून स्वतःस अलिप्त ठेवण्याचा कल वाढीस लागलेला दिसला नसता. महापालिका निवडणुकांमध्ये अनेक मतदारसंघांतील उमेदवारांकडून सुरू झालेले माघारनाट्य आणि त्यामुळे अनेक महापालिका मतदारसंघांत उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याच्या समाजमाध्यमांवरून झपाट्याने फैलावणाऱ्या बातम्यांचेही तसेच काहीसे होत आहे. याला कांगावा म्हणायचे की संभ्रम पसरविण्याचे जाणीवपूर्वक सुरू असलेले प्रयत्न म्हणायचे याचे उत्तर यथावकाश मिळेलच, पण या बातम्यांची शहानिशा करण्याचे कायदेशीर मार्ग उपलब्ध असतानाही, त्याचा पाठपुरावा न करता समाजमाध्यमांवरील चर्चांना प्रसिद्धी देणे हा संभ्रम माजविण्याच्या स्पर्धेस खतपाणी घालण्याचाच प्रकार आहे, असे म्हणावे लागेल. दोन-तीन दिवसांपूर्वी, जेव्हा मुंबईत शिवसेनेचा ठाकरे गट, राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या नव्या आघाडीचा निवडणूक जाहीरनामा प्रसारित होत होता, त्याच दरम्यान उमेदवारांच्या माघारनाट्याच्या गूढाचे पदर काहीसे उकलणारी व समाजमाध्यमांवरून माजविल्या जाणाऱ्या बिनविरोध निवडणुकांच्या गदारोळास वेगळीच कलाटणी देणारी एक ध्वनिफीत समाजमाध्यमांवरून सर्वत्र फैलावत होती. ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून उमेदवारी दिल्या गेलेल्या व अर्जांच्या छाननीत वैध ठरलेल्या एका उमेदवारास उमेदवारी मागे घेण्याचा आदेश पोहोचविणाऱ्या या संभाषणातून सध्याच्या गदारोळाभोवतीचे गूढ अधिकच गडद झाले. सत्ताधारी महायुतीच्या विरोधातील उमेदवारांनी त्यांची उमेदवारी मागे घ्यावी व महायुतीच्या उमेदवाराचा विजय सोपा व्हावा यासाठी सत्ताधाऱ्यांकडून दबावतंत्र आणि दामभेदाचा वापर केला जात असल्याचा आरोप विरोधकांकडून, विशेषतः ठाकरे गटाकडून होत असताना, याच गटाच्या एका उमेदवाराने आपली वैध ठरलेली उमेदवारी मागे घ्यावी यासाठी श्रेष्ठींचा आदेश असल्याचा निरोप पोहोचविणारे ते संभाषण समाजमाध्यमावरून प्रसृत झाले आणि सत्ताधारी महायुतीवरच केल्या जाणाऱ्या आरोपाआड दडलेल्या शंका गडद झाल्या. एक तर, उमेदवारी मागे घेण्याकरिता पैसे देऊन दबाव आणून उमेदवारांस विकत घेतले जात असल्याचा आरोप करणारे ठाकरे गट किंवा काँग्रेससारखे राजकीय पक्ष, आपल्याच उमेदवारांच्या पक्षनिष्ठेवर शंका उपस्थित करत असून पैशाच्या मोहापायी आपले उमेदवार आपल्या पक्षनिष्ठा विकत असल्याची सांगत आपले उमेदवार विकाऊ आहेत, याची कबुली देत आहेत. ठाकरे गटाचा एक नेता आपल्या उमेदवारांस माघार घेण्याचे आदेश देत असल्याची शहानिशा न केलेली ती ध्वनिफीत प्रसृत होऊ लागल्याने, दामभेदाचा प्रभाव उमेदवारांवर पडला, की माघारनाट्यात भरडले गेल्याचा कांगावा करणाऱ्या पक्षांच्या नेत्यांवर पडला याविषयीच्या संशयाचे ढग गडद झाले आहेत.

विरोधकांच्या गोटातील उमेदवारांनी माघार घेतल्याने राज्यातील महापालिकांतील वेगवेगळ्या ६८ मतदारसंघांतील निवडणूक बिनविरोध होणार असल्याची ओरड विरोधकांकडून सुरू झाल्याने निवडणुकांचा पारा चढला असला, तरी याच मुद्यावरून सुरू झालेल्या प्रचारयुद्धाची पातळी मात्र घसरत चालल्याचे दिसू लागले आहे. रविवारी राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेत असेच काहीसे पाहावयास मिळाले. २५ वर्षे मुंबई महापालिकेची सत्ता असताना आजही मराठी माणसाच्या आणि मुंबईला वाचविण्याच्या मुद्यावरच ठाकरे बंधू निवडणुका लढवत असतील, तर २५ वर्षांत यासाठी काय केले, या प्रश्नावरील उद्धव ठाकरे यांच्या उत्तरातून पातळीची घसरण स्पष्ट होते. त्याखेरीज, मुंबई भाजपाच्या एका नेत्याच्या आडनावावरून वारंवार कोटी करत त्या नावाची कुचेष्टा करण्याच्या उद्धव ठाकरे यांच्या विनोदातूनही प्रचाराच्या पातळीचा स्पष्ट अंदाज येतो. भ्रष्टाचार, मुंबईसारख्या बलाढ्य महापालिकेतील सत्ताकाळात केलेल्या कामांचा तपशील, विकाऊ उमेदवारांच्या आवईचे फुटत चाललेले बिंग आदी अनेक प्रश्न आता तापलेल्या प्रचारयुद्धात पुढे येणार असताना, अचानक उद्धव ठाकरे यांचा घसा बसल्याच्या बातम्याही येऊ लागल्या आहेत. या प्रश्नांची उत्तरे त्यांना द्यावी लागतील हे स्पष्ट असताना ठाकरे यांच्यावर मौन पाळण्याची वेळ यावी हा योगायोग मात्र बोलका म्हणावा लागेल. मतदारांत संभ्रम माजविण्याचे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाखालील माध्यमी मंचांचा आधार घेत कांगावा करण्याचे प्रकार नवे राहिलेले नाहीत. मतदारांच्या दुबार नोंदींच्या मुद्यावरून संभ्रम माजविण्यापासून त्याची सुरुवात झाली आहे. प्रतिज्ञापत्राद्वारे किंवा कायदेशीर प्रक्रियेद्वारे हे आरोप करण्याच्या आव्हानाकडे दुर्लक्ष करून समाजमाध्यमांचा वापर करत संभ्रम माजविण्याचा प्रकार सुरू झाला. पातळी घसरविण्याची ही स्पर्धा अशी सुरू असताना, त्या घसरगुंडीवरून किती घरंगळत जायचे, याचे तारतम्य समाजाने बाळगायला हवे, हेच खरे! ▮

## विशेष

# रस्तेबांधणीचा नवा विक्रम

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताचे रस्ते जाळे आता ६३ लाख कि.मी.पेक्षा जास्त पसरले आहेत. त्यामुळे ते जागतिक स्तरावर सर्वांत मोठ्या जाळ्यांपैकी एक बनले आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्रणाली २०१३-१४ मधील सुमारे ९१ हजार २८७ कि.मी.वरून मार्च २०२५ पर्यंत अंदाजे १ लाख ४६ हजार २०४ कि.मी.पर्यंत विस्तारली आहे. ही वाढ सुमारे ६० टक्के आहे. या टप्प्यातील विकास केवळ जाळ्याच्या लांबीवरच नव्हे, तर लांब पल्ल्याचा प्रवास आणि मालवाहतुकीला आधार देण्यासाठी वेगवान कॉरिडॉर आणि द्रुतगती मार्गांवरही केंद्रित होता. २०२५ पर्यंत मोठ्या, बहुवर्षीय महामार्ग कार्यक्रमांनी जाळ्याच्या वाढीला आधार दिला. भारतमाला टप्पा-१ अंतर्गत २६ हजार कि.मी.पेक्षा जास्त अंतराच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी जवळपास १९ हजार ८०० किलोमीटरचे बांधकाम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. हे प्रकल्प आर्थिक कॉरिडॉर, बंदरे आणि सीमा जोडणारे मार्ग तसेच औद्योगिक क्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांपर्यंत पसरले आहेत. या कार्यक्रमांतर्गत ४.९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. तो विस्ताराच्या या टप्प्यातील भांडवली गुंतवणुकीची व्याप्ती अधोरेखित करतो. यासोबतच प्रवेश-नियंत्रित 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉर'चाही वेगाने विस्तार झाला आहे. एक दशकापूर्वी १०० कि.मी.पेक्षा कमी द्रुतगती मार्ग होते; त्याऐवजी आता भारतात प्रमुख शहरे आणि औद्योगिक केंद्रांना जोडणारे हजारो कि.मी.चे वेगवान कॉरिडॉर आहेत. ते लांब पल्ल्याच्या रस्ते प्रवासात एक संरचनात्मक बदल दर्शवतात.

अलिकडच्या वर्षांमध्ये महामार्ग विकासाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अंमलबजावणीचा वेग. २०१० च्या दशकाच्या सुरुवातीपासून बांधकामाचा सरासरी वेग दुप्पट झाला आहे. तो दररोज सुमारे ११-१२ कि.मी.वरून अलिकडच्या वर्षांमध्ये ३० कि.मी.पेक्षा जास्त झाला आहे. सुधारित निविदा प्रक्रिया, जलद मंजुरी, डिजिटल देखरेख आणि सातत्यपूर्ण भांडवली पाठिंब्याने या बदलाला हातभार लावला आहे. राज्यांनीही स्वतःचे महामार्ग आणि द्रुतगती मार्गांचे प्रकल्प हाती घेतले आहेत. ते राष्ट्रीय कॉरिडॉरला पूरक ठरत आहेत. वाहतुकीचा वेळ आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी बंदरे, विमानतळ, लॉजिस्टिक्स पार्क आणि औद्योगिक क्लस्टरना जोडणाऱ्या मार्गांना वाढते प्राधान्य दिले जात आहे. महामार्ग आणि द्रुतगती मार्गांच्या विस्तारामुळे रस्ते वापरकर्ते आणि व्यवसायांना प्रत्यक्ष फायदे झाले आहेत. रुंद रस्ते आणि प्रवेश-नियंत्रित मार्गांमुळे प्रवासाचा वेळ कमी झाला आहे. इंधनाची कार्यक्षमता सुधारली आहे आणि वाहनांचा परिचालन खर्च कमी झाला आहे. जुन्या, अरुंद महामार्गांच्या तुलनेत सुरक्षिततेच्या बाबतीतही सुधारणा झाली आहे. देशभरातील वाहतुकीवर रस्ते वाहतुकीचे वर्चस्व कायम आहे. ती ६४ टक्क्यांहून अधिक मालवाहतूक आणि सुमारे ९० टक्के प्रवासी वाहतूक करते.



२०२५ हे वर्ष रस्ते पायाभूत सुविधांचा वापर आणि वित्तपुरवठा करण्याच्या पद्धतीतील बदलाचेही साक्षीदार ठरले. फास्टॅगद्वारे इलेक्ट्रॉनिक टोलिंगने मॅन्युअल टोल वसुलीची जागा घेतली आहे. त्यामुळे टोल प्लाझावरील गर्दी कमी झाली असून वाहतूक सुरळीत झाली आहे. डिजिटल टोलिंगमुळे महसूल संकलन आणि पारदर्शकता आली आहे. त्यामुळे देखभाल आणि भविष्यातील विस्ताराला मदत झाली आहे. अडथळामुक्त टोलिंग प्रणालीच्या दिशेने कामाला गती मिळाली. त्यात वाहनांना न थांबता किंवा वेग कमी न करता टोल नाक्यांवरून जाण्याची परवानगी देणाऱ्या 'मल्टी-लेन फ्री-फ्लो मॉडेल्स'चा समावेश आहे. या वर्षातील महामार्ग विस्तारामध्ये अधिक व्यापक भौगोलिक विस्तार दिसून आला. ईशान्येकडील प्रदेशातील प्रकल्पांमुळे दुर्गम भागांना राष्ट्रीय जाळ्याशी जोडून कठीण भूभागात कनेक्टिव्हिटी वाढविली गेली. त्याच वेळी ग्रामीण रस्ते योजनांनी शेवटच्या टप्प्यापर्यंतची कनेक्टिव्हिटी वाढविणे सुरू ठेवले. त्यामुळे लहान शहरे आणि गावांमध्ये बाजारपेठा, आरोग्यसेवा आणि शिक्षणापर्यंतची पोहोच सुधारली. पुढील वाटचाल प्रगतीच्या मोठ्या प्रमाणावर असूनही २०२५ मध्ये आव्हाने कायम होती. भूसंपादन विलंब, पर्यावरणीय मंजुरी आणि विविध संस्थांमधील समन्वयाच्या अभावामुळे काही प्रदेशांमध्ये प्रकल्पांच्या वेळापत्रकावर परिणाम होत राहिला. या मर्यादांवर मात करण्यासाठी रस्ते विकास, लॉजिस्टिक्स, रेल्वे आणि शहरी पायाभूत सुविधा एकत्रित करणाऱ्या नियोजन साधनांचा वापर वाढविला जात आहे. २०२५ हे वर्ष संपले असताना, रस्ते आणि महामार्ग विकास भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा एक मुख्य आधारस्तंभ म्हणून उभा आहे. विखुरलेल्या मार्गांवरून एका समन्वित, उच्च-क्षमतेच्या जाळ्याकडे होणारे संक्रमण हे आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी आणि देशभरातील दैनंदिन गतिशीलता सुधारण्यासाठी केलेल्या दीर्घकालीन प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. २०२५ हे वर्ष महामार्ग क्षेत्रासाठी एक पुनर्रचनेचे वर्ष ठरले. चालू आर्थिक वर्षात कंत्राट वाटप आणि बांधकामाच्या उद्दिष्टांवर थोडा परिणाम झाला. आणखी एक बदल म्हणजे व्यापक विचारविनिमयानंतर मालमत्ता मुद्रीकरण धोरणाला अंतिम रूप देण्यात आले.

२०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकांमुळे मागील आर्थिक वर्षात भांडवली खर्च कमी राहिला होता. या वर्षासाठी महामार्ग बांधणीचे लक्ष्य १० हजार किलोमीटर ठेवण्यात आले आहे, तर गेल्या आर्थिक वर्षात १० हजार ६६० कि.मी.चे लक्ष्य साध्य झाले होते. साधारणपणे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये बांधकाम आणि मंजुरीचा वेग वाढतो. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये रस्ते बांधणीचा वेग कमी होऊन ९,०००-९,५०० किलोमीटर (सुमारे २५-२६ किमी/दिवस) होईल, जो आर्थिक वर्ष २०२५ मधील १०,६६० किलोमीटरच्या बांधकामापेक्षा कमी आहे. मंत्रालयाने भूसंपादन आणि पर्यावरण मंजुरीच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या सहामाहीत मंजुरीच्या कामात वाढ होण्याची शक्यता आहे, असे 'आयसीआरए'चे म्हणणे आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारने भारतमाला प्रकल्पांतर्गत नवीन प्रकल्पांना मंजुरी देणे थांबवून 'ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे'वर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. सध्या देशभरात १० हजार कि.मी. लांबीच्या २५ ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवेवर ६ लाख कोटी रुपये खर्चाचे काम सुरू आहे. तिसऱ्या कार्यकाळात सरकारने १.९७ लाख कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यात ग्रामीण रस्ते आणि ९३६ कि.मी. लांबीच्या आठ हाय-स्पीड रस्ते प्रकल्पांचा समावेश आहे. उच्च-गती द्रुतगती मार्ग भांडवल-केंद्रित असतात आणि त्यापैकी बहुतेक प्रकल्प खाजगी क्षेत्राद्वारे 'बिल्ड ऑपरेट ट्रान्सफर' पद्धतीने कार्यान्वित केले जातील. प्रकल्प आकर्षक बनवण्यासाठी सवलत करारामध्ये आणखी बदल करण्यावर काम सुरू आहे. गेल्या आर्थिक वर्षात 'बोट' पद्धतीने ३०० कि.मी. महामार्गांची कामे मंजूर करण्यात आली होती; परंतु या वर्षी या पद्धतीद्वारे महामार्गांच्या विकासासाठी कोणतेही प्रकल्प देण्यात आलेले नाहीत. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# राजकारणाचा भूलभुलैया...

अगदी सहज आणि सोप्या पद्धतीने ज्यात प्रवेश मिळतो, ते क्षेत्र म्हणजे राजकारण! मग तुमची खरी कसोटी लागते! प्रवेश सोपा असला तरी, मग इच्छा असूनही त्यातून बाहेर पडणे कठीण होते. राजकारणाचा हा आधुनिक भूलभुलैया आठवण करून देतो, तो लखनौच्या बडा इमामवाडा या ऐतिहासिक वास्तूतील भूलभुलैयाची! आजच्या राजकारणाची अवस्थाही याच भूलभुलैयासारखीच झालीय, हे तर मान्यच करावे लागेल!

बहुतेकांनी लखनौच्या भूलभुलैया या वास्तूला भेट देत वास्तुकलेच्या चमत्काराचा अनुभव नक्कीच घेतला असेल! काय आहे हा भूलभुलैया... तर नवाब आसफउद्यौला याने १९७५ साली बांधलेली ही वास्तू. बडा इमामवाडा या ऐतिहासिक वास्तूचा एक भाग, म्हणजेच जाळीदार प्रवेशद्वार! अनेक गुप्त मार्ग, अनेक दरवाजे, कान असलेल्या भिंती, आवाज आणि प्रतिध्वनींचा खेळ असे सर्व काही या वास्तूत अनुभवास मिळते. कुठला मार्ग कुठे जाणार आणि कुठे निघणार, याचा जराही अंदाज लावता येत नाही. येथे प्रवेशाचा मार्ग तर दिसतो, पण परतीचा मार्गच सहजासहजी सापडत नाही! हा सगळा जो गोंधळ आहे, तो म्हणजे भूलभुलैया! आता या भूलभुलैयाचा आणि राजकारणाचा काय संबंध? असा विचार नक्कीच तुम्हाला पडला असेल, पण सध्या जी राजकारणाची अवस्था झाली आहे, ती अशीच काहीशी आहे. आजचे राजकारण लखनौच्या भूलभुलैयापेक्षाही एक पाऊल पुढे आहे. किमान तेथे बाहेर काढण्यासाठी कुशल 'मार्गदर्शक' सोबत असतो, येथे तर सोबत असलेलाच आणखी गोंधळात कसे टाकता येईल, याच्या नियोजनात व्यस्त असतो. जसे भूलभुलैयात कुठला मार्ग कुठे जातो, हे ओळखणे कठीण आहे, तसेच राजकारणातही विचारधारा ओळखणे अवघड होऊन बसले आहे. निष्ठा, प्रामाणिकपणा हे शब्द राजकारणाच्या शब्दाकोशात असावेत की नाही यावर नक्कीच चर्चा होऊ शकते. एक काळ होता, जेथे पक्षासाठी सर्वस्व त्यागून झटणारे कार्यकर्ते होते. आता तिकीट मिळावे म्हणून पक्ष त्यागून विचारधारेचा खेळ करणारेच सापडतात. वर्षानुवर्ष सोबत काम करणारा कार्यकर्ताही क्षणात विचारधारा बदलून दुसरीकडे उडी घेतो, तेव्हा न गवसणाऱ्या भूलभुलैयातील रस्त्यांची आठवण होते. राजकारणात अनेक मोठमोठाली स्वप्ने घेऊन लोक येतात. प्रत्येकाचे ध्येय हे सत्ता, पद हेच असतं. अपेक्षा पूर्ण न झाल्यास एका पक्षातून दुसरीकडे उडी मारून इच्छापूर्तीचा प्रयत्न केला जातो, मात्र राजकारणाच्या या भूलभुलैयातून अशांना बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नाही, हे नक्की! भूलभुलैयात जसे भिंतीला कान असतात, असे म्हणतात. जराही पुटपुटलो तरी दुसऱ्या टोकावर ऐकायला जातं, तसेच राजकारणातही तुम्ही कुठल्याही पक्षात का असेनात तुम्ही काय आणि कुणाबद्दल बोलता याची इत्थंभूत माहिती दुसरीकडे पोहोचविणारे कान आहेत. नाहीतर घराच्या बेडरुममध्ये बसून असलेल्या नेत्यांचे व्हिडीओ, महत्त्वाच्या विषयांवरील चर्चा बाहेर जाऊन दुसऱ्यांना राजकारण करण्याची संधी मिळालीच नसती ना?



अनेक मार्गांनी, विविध दरवाजांमधून फिरून शेवटी एकाच ठिकाणी पर्यटकांना आणून ठेवणारी वास्तू म्हणजे भूलभुलैया! राजकारणही तसेच... विकासाच्या नावाने सत्तेच्या केंद्रास्थानापर्यंत पोहोचण्याचा हा चांगला मार्ग आहे. दोन भाऊ, त्यांचे दोन राजकीय पक्ष एकत्र आल्याचा आनंद साजरा करीत नाचणारे आनंदोत्सवाच्या १२ तासांनंतर विकासाची 'री' ओढीत सत्ताधारी पक्षात प्रवेश करीत असतील तर ही जादू सुद्धा भूलभुलैयाचीच म्हणावी लागेल. आज एका पक्षासोबत असला तरी खरंच तो त्याचा आहे का? याची खातरजमा करण्याची वेळ आली आहे. निष्ठा, प्रामाणिकपणा या गोष्टी इतिहासजमा होत, राजकारणात नेत्यांची वाहवा, त्यांच्या मागेपुढे फिरणे आणि आर्थिक कसोट्यांवर मिळणारे गुण अशा निकषांचे महत्त्व वाढले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आज जे चित्र आहे, ते राजकारणाच्या आधुनिक भूलभुलैयाचे आहे. एकीकडे प्रचंड ओढा आणि दुसरीकडे चोळामोळा अशी अवस्था नगर पालिका, महानगर पालिकांच्या निवडणुकांच्या निमित्ताने दिसून आली... हे का? तर राजकारणाच्या झालेल्या भूलभुलैयामुळे! या राजकीय भूलभुलैयात नेते मंडळी इच्छितस्थळी पोहोचतीलही पण सामान्य कार्यकर्त्यांचे काय? त्यांना यातून बाहेर काढणारा 'गाईड' त्यांच्या पाठीशी आहे का? याचा विचार त्यांनीच करावा! कारण लखनौचा भूलभुलैया तर केवळ मनोरंजन आहे, पण राजकीय भूलभुलैया आयुष्याच्या चांगल्या, वाईटाची दिशा स्पष्ट करणारा आहे. ▮

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# वामन पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

भगवान विष्णूंचा पुढील अवतार हा वामन अवतार आहे. ज्या पुराणात वामन अवताराचे प्राधान्याने वर्णन आहे त्या पुराणाला वामन पुराण म्हणतात. वामन अवतार हा मागील अवताराची पुढील कडी आहे. जलचर, उभयचर, भूचरसोबतच पशू, अर्ध मनुष्य, अर्ध पशू आता हा अवतार. मनुष्य पण उंचीने कमी म्हणून वामन असा हा अवतार आहे.

वामन भगवान हे त्रिविक्रम विष्णूंचे पाचवे अवतार. वामन पुराण विष्णू भगवंतांच्या अवताराचे गुणगान करीत असल्यामुळे हे वैष्णव पुराण असले, तरी या पुराणात शिव कथांचे प्राबल्य आहे. शैव आणि वैष्णवांची सांगड घालणारे हे पुराण आहे. उपलब्ध वामन पुराणाचे एकूण ९५ अध्याय असून श्लोकसंख्या ५७९२ आहे. वामन पुराणाच्या प्रारंभीच भगवान वामन यांना नमन आहे.

**'त्रैलोक्यराज्यमाक्षिप्य बलेरिंद्राय यो ददौ ।**
**श्रीधराय नमस्तस्मै छद्मवामनरुपिणे ॥'**

वामन पुराण पुलस्त्य ऋषी आणि नारद संवादाने सुरू होते. एकदा पुलस्त्य ऋषी निवांत बसले असता देवर्षी नारद तेथे आले. त्यांनी पुलस्त्य ऋषींना भगवान वामन यांच्याविषयी सांगण्यास विनंती केली. त्यानुसार पुलस्त्य ऋषींनी नारदांना हे पुराण सांगितले... हिरण्यकश्यपूचा वध भगवान नृसिंह यांनी केल्यावर दैत्य गादीवर प्रल्हाद यांचा राज्याभिषेक झाला. प्रल्हादांना विरोचन नावाचे पुत्र झाले. या दैत्यराज विरोचनाच्या पोटी बली जन्माला आले.

**'दैत्यानामादिपुरुषो हिरण्यकश्यपू: पुरा ।**
**तस्य पुत्रो महातेजाः प्रल्हादो नाम दानवः ।**
**तस्माद् विरोचने जज्ञे बळीर्जज्ञे विरोचनात् ।'**

यावरून विष्णुभक्त प्रल्हादांचे नातू असलेले बळीराजा होत. बळीराजाचा पुत्र बाणासुर होता. बळीचे सामर्थ्य म्हणजे पराक्रमाने स्वर्गावर अधिपत्य मिळवून स्वतः बळीराजा इंद्र झाला; त्याचा पुत्र बाण यम झाला. मयासुर वरुण, राहू चंद्र, ल्हाद अग्नी आणि शुक्राचार्य बृहस्पती झाले. बळीराजा भक्ती आणि शक्तीचा संगम होते. बळीराजाने आपल्या शक्ती आणि पराक्रमाने देवांना पिटाळून लावले. तिन्ही लोकांवर विजय मिळविला.

**'शक्रोभूद् भगवान ब्रह्मन बली बाणो यमो भवत् ।**
**इवरुणो भुन्मयः सोमो राहूल्हादों हुतशनः ॥'**

विशेष म्हणजे राज्य दैत्यांचे असले, तरी सर्वत्र धर्म राज्य होते. देवी महालक्ष्मी बळीराजावर प्रसन्न होती. देवगण मात्र बेघर झालेत. देवराज इंद्र चिंताग्रस्त होऊन माता अदिती आणि कश्यप ऋषींकडे गेले. आपली व्यथा त्यांना सांगितली. कश्यपांनी स्पष्ट सांगितले की, बळीराजाचा पराभव देवांकडून होणे केवळ अशक्य आहे. अशावेळी कश्यप अदिती देवगण आणि ब्रह्मदेवासह भगवान विष्णूंकडे गेले. त्यांनी क्षीरसागर काठी भगवंतांचे स्त्रोत्र गायन सुरू केले.

**'नमः पंकजनेत्राय नमः पंकजनाभये ।**
**नमः पंकजसंभूतिसंभवायात्मयोनये ॥'**

भगवान विष्णू प्रसन्न होऊन बळीराजाच्या उपाययोजनेसाठी मी कश्यप-अदितीच्या पोटी वामन म्हणून जन्माला येईन, असे वचन दिले. भगवान विष्णू अदितीच्या गर्भात धारण होताच सर्व दैत्यांची शक्ती क्षीण झाली. राक्षसांचे अचानक अवमूल्यन का होत आहे, असा प्रश्न बळीराजाने आपले आजोबा प्रल्हादांना विचारला असता प्रल्हादांनी अंतःचक्षूंनी पाहिले. राक्षसांना परास्त करण्यासाठीच भगवान वामन जन्म घेणार आहेत. त्यामुळे आपली शक्ती क्षीण होत आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. तेव्हा दैत्यराज बली आपल्या आजोबा म्हणजे प्रल्हादांना म्हणाले की, आपल्या जवळ एकाहून एक दैत्य आहेत. आपण वामनांना परास्त करू. तेव्हा प्रल्हाद दैत्यराज बलीवर प्रचंड संतापले... ''अरे! सर्व ब्रह्मांड ज्याचा अंश आहे त्यांच्याविषयी तुझ्या मनात असा दुष्ट भाव असेल तर तुझाही नाश समीप आहे.'' तेव्हा बळीराजांनी आजोबाची क्षमा मागितली आणि भगवान विष्णूंप्रति शरणभाव ठेवला. अश्वमेघ यज्ञ प्रारंभ केला. इकडे माता अदितीच्या पोटात गर्भ वाढत होता.

**'ततो मासेऽथ दशमे काले प्रसव आगते ।**
**अजायत स गोविंदों भगवान वामनाकृतिः ॥'**

भगवान माता अदितीच्या पोटी वामन आकारात जन्माला आले. सर्वत्र आनंद दाटला. ब्रह्मदेवाने त्यांना मृगचर्म दिले. बृहस्पतींनी यज्ञोपवीत, मरीचींनी पलाशदंड, वशिष्ठांनी कमंडलू, अंगिरा ऋषींनी रेशमी वस्त्र, पुलस्त्य ऋषींनी पितवस्त्र दिले. वामन भगवंत जटा, दंड, छत्र, कमंडलू धारण करून ते बळीराजाच्या यज्ञस्थानी जाण्यास सिद्ध झाले. इकडे बळीराजाला दैत्यगुरू शुक्राचार्यांनी आधीच सावध केले. भगवान विष्णू वामन रूपात येत आहेत.

**'त्वयास्य दैत्याधिपते स्वल्पकेपि ही वस्तुनि ।**
**प्रतिज्ञा नैव वोढव्या वाच्यं साम तथा फलम् ॥'**

कोणतीही वस्तू देण्याचा संकल्प सोडू नको. प्रतिज्ञा करू नको. तेव्हा बळीराजा म्हणतात की, ''गुरुवर्य, ज्याच्याकडे जग याचना करते तो ईश्वर माझ्या दारात याचक बनून येत असेल तर त्याला मी नकार कसा देऊ?'' असा संवाद सुरू असतानाच प्रत्यक्ष वामन भगवान तिथे पोचले. बळीराजाने नमस्कार करून, काय सेवा करू? अशी विचारणा केल्यावर भगवान म्हणाले की, मला अग्निशाळेसाठी तीन पाऊले जमीन हवी! संकल्पपूर्तीसाठी बळीराजाने हातावर जल सोडून जलसिंचन केले. हातावर जल पडताच वामन भगवान अवामन झाले. विराट रूपाने त्यांनी ब्रह्मांड व्याप्त केले.

**'प्रणम्य च अर्शिन प्रथम क्रमेन ।' प्रथम पदन्यासात पृथ्वी व्याप्त केली.**
**'देवो द्वितीयेन जहार वेगात ।' द्वितीय पदन्यासात आकाश व्याप्त केले.**
**'क्रमं तृतीयं न यदास्य पूरितं ।'**

तिसऱ्या पावलासाठी जागा नसल्यामुळे दैत्यराज बळीच्या पाठीवर पाय ठेवून त्याला हजार योजने पृथ्वीत घातला. राक्षसांना परास्त केले. बळीराजावर कृपा करून त्याला सुतल नावाचे पाताळ निवासासाठी दिले. त्याला चिरकाल चिरंजीवित्व दिले. वचन दिल्याप्रमाणे इंद्राला त्याचे राज्य परत केले. वामन पुराणात वामन कथा अध्याय २३ ते ३१ आणि अध्याय ७३ ते ७८ यामध्ये दिली आहे. भगवान वामन कथाभागासोबत इतर अध्यायात भगवान शंकरांची कथा, दक्षयज्ञ, सतीचा प्राणत्याग, दक्षयज्ञ विध्वंस ही कथा दिली आहे. याच पुराणात नर नारायण उत्पत्ती, मदन दहन कथा आहे. हिरण्याक्ष पुत्र अंधकासुर, त्याचा देवांवर विजय. सुकेशीची कथा, २१ नरकांचे वर्णन, पर्वत-नद्यांचे वर्णन या पुराणात आहे. महिषासुर अत्याचार, भगवती कात्यायनीचे प्रकट होणे, चंड, मुंड, महिषासुर वध, कुरुक्षेत्र वर्णन, सरस्वती नदीचे वर्णन, राजा वेन चरित्र, पृथु राजाचा जन्म, वेनराजा कृत शिव स्तुती, ब्रह्मदेवाचे चार मुख उत्पत्ती कथा, हिमालय पत्नी मैनादेवीच्या पोटी तीन कन्यांचा जन्म, उमादेवीची तपश्चर्या, उमा-महेश्वर विवाह, विश्वकर्मा द्वारा उमा-शिव यांच्यासाठी गृह निर्माण हे विषय वामन पुराणात आले आहेत. भगवतीद्वारा नमुची वध, शुंभ-निशुंभ, धूम्रलोचन, चंडमुंड वध, भगवान कार्तिकेय जन्म, नंदीद्वारा हरी आणि हराचे अद्वैत. याशिवाय स्वायंभुव, स्वरोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष मन्वंतराच्या मरुद्गण उत्पत्ती, कालनेमीचे भगवान विष्णूंशी युद्ध, कालनेमी वध, प्रल्हाद यात्रा, गजेंद्र मोक्ष कथा, विविध स्तोत्र इत्यादी बाबी वामन पुराणात आहेत. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### राजकीय घराण्यांची युवा पिढी मैदानात

राजकारण हे केवळ सत्ता मिळविण्याचे माध्यम न राहता, आता अनेक कुटुंबांसाठी वारसा बनत आहे. याची झलक महापालिका निवडणुकीत दिसून येत असून, अनेक बाप-बेटे निवडणुकीच्या रिंगणात नशीब आजमावत आहेत, तर काहींनी मुलाच्या विजयासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. यानिमित्त नव्या-जुन्यांचा संगम दिसत असून, मतदार त्यांना साद घालणार काय? गेल्या काही दशकांपासून सक्रिय असलेल्या प्रस्थापित नेत्यांनी आपला वारसा पुढच्या पिढीकडे सोपविण्यासाठी त्यांना मैदानात उतरविले आहे. काही नेते स्वतः मुलाबरोबर निवडणूक रिंगणात नशीब आजमावत आहेत. नवी पिढी उच्चशिक्षित असल्यामुळे आधुनिक विचारसरणी घेऊन मैदानात उतरली आहे, तर जुन्या पिढीने आपला जनसंपर्क, संघटनात्मक ताकद आणि राजकीय अनुभव पणाला लावल्याचे दिसून येत आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचार, थेट संवाद आणि तरुण मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्नही त्यांच्याकडून केला जात आहे. दुसऱ्या पिढीतील उमेदवारांसमोर केवळ कुटुंबाच्या नावावर मते मिळवण्यापेक्षा स्वतःचे कर्तृत्व आणि विकासाची स्पष्ट दृष्टी सिद्ध करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. ज्येष्ठ नेत्यांनी स्वतः बाजूला ठेवत आपल्या पुढच्या पिढीला संधी दिली आहे. परिणामी अनेक प्रभागांमध्ये पारंपरिक नेते आणि तरुण उमेदवारांमध्ये थेट लढत रंगण्याची शक्यता आहे. मतदार नवे नेतृत्व स्वीकारणार की अनुभवी हातांनाच संधी देणार हे लवकरच दिसेल.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

● ● ● ●

### शालार्थ आयडी घोटाळ्यात नागपूर विभागात ६३२ नावे

शालार्थ वेतन प्रणाली व शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीत नागपूर विभागात ६३२ जणांची नावे समोर आली असली तरी मोठ्या प्रमाणावर अटक होण्याची शक्यता कमी असल्याचे अधिकृत सूत्रांचे मत आहे. ही नावे प्रशासकीय तपासणीत नोंदवली गेली असून, ठोस पुरावे, मनी ट्रेल व सक्रिय सहभाग आढळलेल्या मोजक्या प्रकरणांतच फौजदारी कारवाई होणार आहे. सरकारचा भर वेतन नोंदी स्वच्छ करणे, आर्थिक नुकसान वसूल करणे आणि प्रणालीगत सुधारणा करण्यावर असून, निवडक सूत्रधारांवरच कारवाई होण्याचे संकेत आहेत. शिक्षण क्षेत्रातील निरीक्षक आणि शिक्षक संघटनांनी शाळांतील मुख्याध्यापकांमध्ये वाढत चाललेल्या भीतीच्या वातावरणाकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, तत्काळ अटकेची भीती प्रत्यक्षात वाढवून सांगितली जात असून ती अनेकदा अनौपचारिक इशारे व कायदेशीर सल्ल्यांच्या माध्यमातून पसरवली जात आहे. संघटनांचा आरोप आहे की, चौकशीभोवती असलेल्या अनिश्चिततेचा फायदा घेत काही वकील व खालच्या स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणेतील मध्यस्थ प्राचार्य व मुख्याध्यापकांना त्रास देण्यासाठी किंवा आर्थिक तडजोडींसाठी दबाव टाकत आहेत. यातील अनेक जण दीर्घकाळापासून सामाजिक व व्यावसायिक प्रतिष्ठा लाभलेले शिक्षक आहेत.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

● ● ● ●

### हिंदूंसाठी धोक्याची घंटा!

महिनाभरापासून बांगलादेशातील जी परिस्थिती आहे ती हिंदूंसाठी दिवसेंदिवस अधिकच चिंताजनक होत चालली आहे. जीव मुठीत घेऊन तेथील हिंदू आज अस्तित्वासाठी धडपडताना दिसत आहेत. कधी काळी २० टक्के असणारी हिंदूंची संख्या आज २ टक्क्यांवर आली आहे. पाकिस्तानमध्येही हीच स्थिती आहे. अफगाणिस्तान हे देखील पहिले हिंदुबहुल राष्ट्र होते, पण आज तिथे तालिबान्यांची सत्ता आहे. भारतात देखील अनेक राज्यांमधील, विशेष करून सीमावर्ती भागातील बरेचसे जिल्हे हे मुस्लिमबहुल आहेत आणि काही होण्याच्या मार्गावर आहेत. आज पाकिस्तान आणि बांगलादेश येथील हिंदू हे जात्यात असतील तर आपण सुपात आहोत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. काश्मीर हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. उद्या ही वेळ भारतावर येऊ नये यासाठी सरकारने आता हिंदूंच्या संरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. कारण हिंदूंवरील अत्याचार इतके टोकाला पोहोचलेले असताना आणि महिनाभरापासून एवढा हिंसाचार चालू असताना शेजारी देश असणाऱ्या भारताने गुळमुळीत भूमिका घेणे अपेक्षित नाही. पाकिस्तानसोबत असलेला सिंधू जल करार रद्द करून ज्याप्रमाणे पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या, त्याचप्रमाणे बांगलादेशला देखील त्याची आर्थिक कोंडी करून वठणीवर आणणे आवश्यक आहे, कारण बांगलादेश बऱ्याच गोष्टींसाठी भारतावर अवलंबून आहे. भारताला विश्वगुरू बनायचे असेल तर बांगलादेशमधील हिंदूंची स्थिती आपण नुसती कशी काय बघू शकतो? ▮

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महानगरपालिका प्रभाग ११ : काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादीच्या तूल्यबळ लढाईत एमआयएमचे उमेदवार रंग भरणार का? मुस्लिम प्राबल्य भागात काँग्रेसचे वर्षानूवर्षापासून वर्चस्व

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** महानगरपालिका प्रभाग ११ : काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादीच्या तूल्यबळ लढाईत एमआयएमचे उमेदवार रंग भरणार का? मुस्लिम प्राबल्य भागात काँग्रेसचे वर्षानूवर्षापासून वर्चस्व

परभणी,दि.०६(प्रतिनिधी) : महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत मुस्लिम समाजाचे प्राबल्य असणाऱ्या प्रभाग क्रमांक ११ अंतर्गत चारही गटात काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशीच थेट लढाई होणार असून या लढाईत एमआयएमचे उमेदवार रंग भरणार का? असा प्रश्न आहे. त्यामुळे या लढतीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

महानगरपालिकेंतर्गत प्रभाग क्रमांक ११ च्या हद्दीत सर्व्हे नं. ५७१, काझी बाग, मेमन कॉलनी, एकमिनार मस्जिद परिसर, तुराबुल हक दर्गाह परिसर, खुर्रमअली खान लेआऊट, शिक्षक कॉलनी, अन्सार कॉलनी, खुर्बान अली शाह नगर, बालाजी नगर, देशपांडे लेआऊट, शौकत कॉलनी, मास्टर कॅफे परिसर समाविष्ट आहे.

या प्रभागातील ‘अ’ या नागरीकांचा मागास प्रवर्गातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून अब्दुल जावीद अब्दुल रशीद, काँग्रेसकडून शमशाह बेगम सय्यद इलाही तर एमआयएमकडून सय्यद मतीन मोहसीन, यशवंत सेनेकडून गुलशाह बेगम सय्यद उबेद या चौघे रिंगणात आहेत. राष्ट्रवादीचे अब्दुल जावीद अब्दुल रशीद हे मनपाचे माजी सदस्य आहेत. एमआयएमकडून त्यांच्या कुटूंबातील सदस्य यापूर्वीच्या एका पोट निवडणूकीतून निवडून आले होते. काँग्रेस व एमआयएम या दोन्ही पक्षाचे उमेदवार हे नवे




चेहरे आहेत. मुस्लिम समाजाचे पूर्णतः प्राबल्य असणाऱ्या या प्रभागात अन्य धर्मिय एकही उमेदवार रिंगणात नाही. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर एमआयएम या पक्षानेसुध्दा चारही जागांवर त्यांचे उमेदवार लढतीत उतरविले आहे. परंतु, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस अशीच थेट लढत होईल, असे चित्र आहे.

येथील ‘ब’ या सर्वसाधारण महिला गटात खमीसा नजमाबानो खमीसा जानमोहम्मद या राष्ट्रवादी काँग्रेसकडून, जकीरा बेगम मोहम्मद नैमोद्दीन या काँग्रेसकडून तर समीना नाजरहेमान खान या एमआयएमकडून, खान साजीया मुदस्सर या वंचित बहुजन आघाडीकडून, बुराखबी शेख गुलाम या यशवंत सेनेकडून व शगुफ्ता नाज शेख जावेद या अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. येथील लढत काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशीच पारंपारिक लढत असणार आहे.

येथील ‘क’ या सर्वसाधारण महिला गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने साबेरा बी शफीक खान, काँग्रेसने रुकसाना बेगम सय्यद अब्दुल हमीद, एमआयएमने आलिया अंजूम मोहम्मद गौस तर यशवंत सेनेने पठाण नाजमीन शकील मोईनोद्दीन यांच्यासह अलीफराह नाज सय्यद अकबर, गुलनाज सलीमोद्दीन इनामदार व पठाण दुर्राणी शब्बीर अहेमद खान व शमीम बेगम हे अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. यातील आलिया अंजून मोहम्मद गौस व पठाण नाजमीन शकील मोईनोद्दीन या माजी सदस्या आहेत. तर गुलनाज सलीमोद्दीन इनामदार या सामाजिक कार्यकर्ते सलीम इनामदार यांच्या कुटूंबातील आहेत. या प्रभागात काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशीच लढाई होणार हे स्पष्ट आहे.

येथील ‘ड’ या सर्वसाधारण गटातून काँग्रेसकडून खान मुसदीक खान नरुल्ला खान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून शाकेर खान मोईन अहेमद खान, एमआयएमकडून शेख शेख इमरान शेख शेख आमीर व यशवंत सेनेकडून मोहम्मद हारुन मोहम्मद बशीरमियाँ हे चौघे रिंगणात आहेत. परंतु, खरी लढत ही काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी अशीच होईल, अशी स्पष्ट चिन्हे आहेत. गेल्या निवडणूकीत या प्रभागातील चारपैकी तीन उमेदवार हे काँग्रेसकडून व एक अपक्ष विजयी झाले होते.

## वनामकृवित दर्पण दिन साजरा; उत्कृष्ट पत्रकार संघ पुरस्काराबद्दल परभणी जिल्हा पत्रकार संघाचा सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिन दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रम विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या पुढाकाराने व परभणी जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने विद्यापीठात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माननीय जिल्हाधिकारी श्री संजयसिंह चव्हाण व विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार श्री विजय जोशी होते.

दर्पण दिनानिमित्त माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. तसेच अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेमार्फत दिला जाणारा वसंतराव काणे राज्यस्तरीय उत्कृष्ट जिल्हा मराठी पत्रकार संघ पुरस्कार परभणी जिल्हा पत्रकार संघाला मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमादरम्यान माननीय जिल्हाधिकारी



श्री संजयसिंह चव्हाण व विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांनीही मार्गदर्शन केले.

हा पुरस्कार परभणी जिल्हा पत्रकार संघाला मिळाल्यानिमित्त विद्यापीठाच्या वतीने शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांच्या हस्ते परभणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री प्रभू दिपके व संघाच्या सर्व सन्माननीय सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे मुख्य विस्तार शिक्षणाधिकारी डॉ. प्रशांत देशमुख व जनसंपर्क अधिकारी डॉ. शंकर पुरी उपस्थित होते.

हा पुरस्कार मिळण्यासाठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. प्रभू दिपके, कार्याध्यक्ष श्री. लक्ष्मण मानोलीकर, श्री. राजू हट्टेकर, श्री. विठ्ठल वडकुते, श्री. सुधाकर श्रीखंडे, श्री. मोईन खान, श्री. अनिल दाभडकर, श्री. संजय बगाटे, श्री. रामेश्वर शिंदे, श्री. गणेश पांडे आदींनी वर्षभर विविध उपक्रम राबविले. याबद्दल विद्यापीठाच्या वतीने शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी त्यांचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संखेने उपस्थित होते.

## वृक्ष लागवड वाढविण्यावर भर द्या : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण :

### सामाजिक वनीकरण योजनांचा आढावा

**परभणी,/प्रतिनिधी :** शासनाच्या सामाजिक वनीकरण योजनांची प्रभावी प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांशी समन्वय साधून माहितीची देवाणघेवाण करावी, वृक्ष लागवड वाढविण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार ६ जानेवारी रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सामाजिक वनीकरण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची आढावा बैठक आज संपन्न झाली. बैठकीस विभागीय वन अधिकारी मनोहर केवलदास गोखले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण, जिल्हा कृषी अधीक्षक दौलत चव्हाण, सहाय्यक वनसंरक्षक (प्रा.), उपजिल्हाधिकारी (रोहयो), सामाजिक वनीकरण परभणीचे सहाय्यक वनसंरक्षक तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सामाजिक वनीकरण अंतर्गत अधिकाधिक वृक्षलागवड वाढविण्यासाठी रस्ते, कालवे, लोहमार्ग दुतर्फा तसेच गट लागवडीसाठी उपलब्ध क्षेत्रांची सविस्तर माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक वृक्ष लागवड वाढविण्यावर विशेष भर देण्यात यावा, जेणेकरून पर्यावरण संवर्धनासोबतच ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असेही यावेळी सांगण्यात आले.

## परभणी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नदीप कळमकर यांची निवड

परभणी,दि.०६(प्रतिनिधी) : परभणी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नदीप रमेशचंद्र (सावजी) कळमकर तर उपाध्यक्षपदी डॉ. अशोक कुलकर्णी सेलगांवकर व हरिकिशन शर्मा यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

परभणी जिल्ह्यातील सहकार त्र अधिक बळकटी देण्यासाठी तसेच पतसंस्थांच्या विविध अडचणी मार्गी लावण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या परभणी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनची पहिली सर्वसाधारण सभा आज मंगळवार ६ जानेवारी रोजी जिंतूर येथील फेडरेशनच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. सभेच्या प्रारंभी अर्थपूर्तीचे उपाध्यक्ष किशोर देशपांडे यांनी फेडरेशनच्या स्थापनेमागील भूमिका, उद्दिष्टे आणि भविष्यातील दिशा याबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत फेडरेशनच्या अध्यक्षपदी कळमकर यांची, तर उपाध्यक्षपदी डॉ. सेलगांवकर व शर्मा यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताना कळमकर म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व लहान-मोठ्या पतसंस्थांना भेडसावणाऱ्या अडचणी सोडवणे, त्यांच्यात परस्पर समन्वय निर्माण करणे तसेच सहकार चळवळीला सक्षम आणि सकारात्मक दिशा देणे हे परभणी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे प्रमुख उद्दिष्ट राहील. सर्व घटकांना विश्वासात घेऊन जिल्ह्यातील सहकार चळवळीला नवा आयाम देण्यासाठी फेडरेशन प्रयत्नशील राहील, असा विश्वास व्यक्त केले.

रत्नदीप कळमकर यांचा सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव लक्षात घेता, फेडरेशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील पतसंस्थांचे प्रश्न प्रभावीपणे शासनदरबारी मांडले जातील, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच उपाध्यक्षपदी डॉ. अशोक सेलगांवकर व हरिकिशनजी शर्मा यांच्या निवडीमुळे फेडरेशनला अनुभवी व सक्षम नेतृत्व लाभल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.

या सभेला ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी, सर्जेराव लहाने, केदार गजमल, डॉ. प्रकाश अकोशे, किरण चव्हाण, संग्राम सोनी, दिलीप कुलकर्णी, दिलीप देशपांडे, किशोर देशपांडे यांच्यासह जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे पदाधिकारी, संचालक तसेच सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परभणी जिल्हयात वाढली थंडी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयात थंडी गेल्या काही दिवसांपासून वाढलेली दिसून येत आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झालेले दिसून आले आहेत. त्यातच या थंडीचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतांना दिसून येत आहे. सकाळच्या सुमारास नागरिकांची ये-जा करण्याची संख्या चांगलीच कमी झालेली आहे. त्यातच नागरिकांना आरोग्याच्या समस्या चांगल्याच जाणवू लागल्या असल्याकारणामुळे ही थंडी झोंबत आहे.

## कोरडवाहू शेतीसाठी वरदान ठरणारा बिडिएनपीएच २०१८-०५ तुरीचा वाण- कुलगुरू प्रा.(डॉ.) इन्द्र मणि

**परभणी ,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्राद्वारे विकसित करण्यात आलेल्या तुरीच्या बीडीएनपीएच२०१८०५ या संकरित वाणास केंद्र शासनाकडून अधिकृत अधिसूचनेद्वारे मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठांद्वारे शिफारस करण्यात आलेला हा पहिलाच तुरीचा संकरित वाण असून, भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. .. ६१२३(), दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अन्वये बीडीएनपीएच२०१८०५ या वाणास अधिसूचित वाण म्हणून घोषित करण्यात आले आहे.

हा वाण महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या राज्यांसाठी शिफारसीत करण्यात आला असून, कोरडवाहू तसेच सिंचित परिस्थितीत लागवडीस योग्य आहेत.

यानिमित्त बोलताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या कडधान्य उत्पादन मोहिमेसाठी नुकताच अधिसूचित करण्यात आलेला तुरीचा संकरित वाण बिडिएनपीएच १८०५ हा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल. या वाणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची भरीव आर्थिक उन्नती साधता येईल. तसेच हा वाण कोरडवाहू तसेच बदलत्या हवामानाच्या परिस्थितीतही उपयुक्त ठरेल. विद्यापीठ ‘‘शेतकरी देवो भव:’’ या भावनेतून सातत्याने कार्य करत असून, बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्राने यापूर्वी तुरीच्या वाणांच्या विकासामध्ये राष्ट्रीय पातळीवर अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. यामध्ये




प्रामुख्याने तुरीच्या गोदावरी या वाणापासून शेतकऱ्यांनी कोरडवाहू क्षेत्रात एकरी १० ते १२ क्विंटल तर ठिबक सिंचनाखाली लागवड केल्यास जवळपास १८ क्विंटलपर्यंत उत्पादन घेतले आहे. गोदावरी वाणामुळे शेतकऱ्यांना साधारणपणे एकरी एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळत असल्याच्या प्रतिक्रिया विद्यापीठास प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरी विद्यापीठाद्वारे विकसित तुरीच्या गोदावरी वाणाकडे ऊसाला पर्यायी पीक म्हणून पाहत आहेत. याचप्रमाणे बिडिएनपीएच २०१८०५ हा संकरित वाणही शेतकऱ्यांसाठी तितकाच लाभदायक ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी सांगितले की, या नवीन वाणाच्या प्रसारामुळे तुरीच्या पिकाचे उत्पादन तसेच उत्पादनातील स्थैर्य वाढण्यास मोठी मदत होणार असून, शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

या वाणांच्या निर्मितीत सहभागी शास्त्रज्ञांचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि व संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी अभिनंदन केले. सदर वाण विकसित करण्यामध्ये विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, शिक्षण संचालक भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे, माजी संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर, व विभागप्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य शास्त्रज्ञ तथा प्रभारी अधिकारी डॉ. दीपक पाटील आणि शास्त्रज्ञ डॉ. विष्णू गीते यांनी प्रमुख कार्य केले. त्यांना डॉ. किरण जाधव, डॉ. प्रशांत सोनटक्के, डॉ. पी. ए. पगार व डॉ. ज्ञानेश्वर मुटकुळे या शास्त्रज्ञांनी सहकार्य केले. शेतकऱ्यांसाठी हा संकरित वाण लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल, असे संशोधन केंद्राच्या वतीने कळविण्यात आले.

वाणाची वैशिष्ट्ये

या वाणाची उत्पादकता १७५९ ते २१५९ किलोग्रॅम प्रति हेक्टरी इतकी असून हा वाण १५५ ते १६० दिवसात तयार होतो. दाण्याचा रंग पांढरा असून मर आणि वांझ या तुरीच्या प्रमुख रोगांकरिता हा वाण मध्यम प्रतिकारक आहे. तसेच किडींना कमी बळी पडतो. .

## संक्षिप्त वृत्त...

### दर्पण दिनानिमित्त वरपूडकर महाविद्यालयात पत्रकारांचा सन्मान

**सोनपेठ / प्रतिनिधी -** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त तालुक्यातील पत्रकार बांधवांचा समाज सोहळा आयोजित करण्यात आला होता.

बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेत वृत्तपत्र सुरू करून समाजजागृतीचे मोठे कार्य केले. त्यांना मराठी वृत्तपत्रांचे जनक मानले जाते. महाराष्ट्रात दर्पण दिन हा पत्रकार दिन म्हणूनही ओळखला जातो असे मत अध्यक्षीय समोर प्रसंगी प्राचार्य वसंत सातपुते यांनी व्यक्त केले.

दर्पण दिनानिमित्त सोनपेठ येथे पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री रामेश्वर कदम हे होते. तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. वसंत सातपुते व समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील हे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे सर्वप्रथम पूजन करण्यात आले. त्यानंतर सन्मानमूर्ती सर्व पत्रकार बांधव यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पत्रकार शिवमल्हार वाघे, गणेश पाटील, गजानन चिकणे, भागवत पोपडे, सिद्धेश्वर गिरी, आशिष मुंढे, बाबासाहेब गर्जे, सोमनाथ नागुरे, महादेव नरवटे, सुभाष सावंत, कल्याण वाघमारे, किरण स्वामी, प्रशांत बिराजदार, गणेश नाईक आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकार शिवमल्हार वाघे , गणेश पाटील यांनी पत्रकाराची भूमिका व पत्रकारितेचे समाजातील महत्त्व समजावून देत सत्काराला उत्तर दिले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ वसंत सातपुते यांनी पत्रकारांच्या सकारात्मक भूमिकेचे कौतुक करत महाविद्यालयाच्या कार्यक्रम व उपक्रमांना वेळोवेळी यथोचित प्रसिद्धी दिल्याबद्दल सर्व पत्रकार बांधवांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मुक्ता सोमवंशी यांनी केले. तर आभार प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये यांनी मानले.

### महानगरपालिका निवडणुकीसाठी ‘वोट फॉर परभणी’ मतदार जनजागृती उपक्रम

**परभणी / प्रतिनिधी -** महापालिका निवडणूकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने ‘वोट फॉर परभणी’ हा विशेष मतदार जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती अर्थात युवक दिनानिमित्त आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत शहरातून भव्य ‘वॉक फॉर वोट’ काढण्यात येणार असून, यामध्ये शालेय विद्यार्थी, नागरिक, अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. वॉक फॉर वोटमध्ये सहभागी होणारे विद्यार्थी आपापल्या शाळेच्या गणवेशात सहभागी होणार असून, या रॅलीत बँड पथक, घोषवाक्यांचे फलक, सैनिकी शाळेचे विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) चे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या उपक्रमात शहरातील विविध क्रीडा संघटना, शाळा व महाविद्यालयांचा सहभाग असणार आहे.

वॉक फॉर वोटचा मार्ग शनिवार बाजार येथून सुरू होऊन गांधी पार्क, अष्टभुजा देवी मंदिर, गोल्डन बेकरी, कन्या प्रशाला, वि'यवरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे राजगोपालचारी उद्यान येथे येऊन या उपक्रमाचा समारोप होणार आहे. या ठिकाणी सर्व शालेय विद्यार्थी व नागरिक एकत्र आल्यानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या नियोजनासंदर्भात नुकतीच महानगरपालिकेत बैठक पार पडली. या बैठकीस निवडणूक अधिकारी नितीन नार्वेकर, स्वीपचे नोडल अधिकारी गणेश शिंदे, क्रीडा मार्गदर्शक रंजीत काकडे, कैलास माने तसेच मतदार जनजागृती पथकातील राजकुमार जाधव, प्रवीण वायकोस, अरविंद शहाणे, मोहन आल्हाट, प्रफुल्ल शहाणे, संजय पेडगावकर, अतुल सामाले, गोविंद कपाटे, अर्जुन झटे, त्र्यंबक वडसकर आदी उपस्थित होते.

‘वोट फॉर परभणी’ या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या समारोपस्थळी राजगोपालचारी उद्यान येथे अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.

### चित्रकला एक व्यक्तिमत्व विकासाचे आदर्श माध्यम - डॉ.विवेक नावंदर

**परभणी,/प्रतिनिधी :** कलेच्या क्षेत्रात होणारे वैविध्यपूर्ण बदल पाहता व एआय या आधुनिक तंत्रासह झपाट्याने होणारे जागतिक बदल लक्षात घेता चित्राच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यासाठी व्यक्तिमत्व घडवण्यासाठी महत्त्वाचे आदर्श साधन म्हणून पाहताना चित्रकलेला महत्त्वाचे स्थान प्रत्येकाने आपल्या आयुष्यात दिले पाहिजे, असे मत बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सचिव तथा कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. विवेक नावंदर यांनी व्यक्त केले.

बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान स्व.डॉ. पांडुरंगजी नावंदर (बाबुजी) यांच्या जयंती निमित्त रविवार ४ जानेवारी रोजी अंबीका नगरातील बाल विद्याविहार प्रशालेत भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे दीप प्रज्वलन व चित्रकलेच्या विषय फलकाचे अनावरण करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# प्रा.ममता राठी जळीत प्रकरणाचे गूढ अखेर उलगडले
# मानलेल्या भावास आत्महत्येपासून रोखताना झाली दुर्घटना

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ जानेवारी**

अंबाजोगाई : येथील एका नामांकित संस्थेतील प्राध्यापिका डॉ. ममता शामसुंदर जखोटिया (राठी) यांच्या जळीत प्रकारचे सत्य अखेर त्यांच्या जबाबानंतर समोर आले आहे. मानलेला भाऊ धनाजी आर्य यांना आत्महत्येपासून रोखताना अपघाताने मी भाजले असे ममता राठी यांनी जबाबातून स्पष्ट केले आहे.

त्यामुळे या दुर्घटनेबाबतीत सुरु असलेल्या घातपाताच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. दरम्यान, ममता राठी यांच्यावर लातूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती अति चिंताजनक आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, डॉ. ममता राठी (रा. पिताजी माउली नगरी, अंबाजोगाई) या अंबाजोगाई येथील एका नामांकित महाविद्यालयात वाणिज्य विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. ४ जानेवारी रोजी त्यांचे सहकारी आणि मानलेले भाऊ धनाजी आर्य यांनी त्यांना फोन करून कॉलेजमधील राजकारणामुळे आपल्याला मोठा त्रास होत असल्याने आता जगण्याची इच्छा उरली नसल्याचे सांगितले. भावाचा जीव धोक्यात असल्याचे लक्षात येताच ममता यांनी तात्काळ जवळगाव फाटा गाठले. त्या ठिकाणी धनाजी आहे हातात डिझेलची बाटली घेऊन स्वतःला संपवण्याच्या तयारीत होते.



धनाजी आर्य स्वतःच्या अंगावर डिझेल ओतत असताना ममता यांनी धाडसाने त्यांच्या हातातील बाटली हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत बाटलीतील डिझेल ममता यांच्या अंगावर सांडले. ममता यांनी धनाजीच्या हातातील काडीपेटी देखील फेकून दिली, त्याच वेळी त्यांच्या कोटाला अचानक आग लागली. नंतर या आगीत अंगालाही जाळ लागल्याने ममता राठी या गंभीररीत्या भाजल्या गेल्या. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आणि धनाजी आर्य यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला आणि ममता यांना तातडीने उपचारासाठी लातूर येथील रुग्णालयात हलवले असे त्यांनी बर्दापूर पोलिसांना दिलेल्या जबाबात सविस्तर कथन केला आहे. सध्या ममता राठी यांच्यावर लातूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून ८० टक्के भाजल्याने त्यांची प्रकृती अति चिंताजनक आहे.

**शैक्षणिक क्षेत्रात हळहळ**

प्रा. ममता राठी या उच्च विद्याविभूषित असून त्यांनी वाणिज्य विषयात पीएचडी प्राप्त केली आहे. सहजसोप्या भाषेत विषय समजाविण्यात त्यांचा हातखंडा आहे. प्रा. राठी यांचे स्वतःचे युट्युब चॅनल असून त्याद्वारे त्या विद्यार्थ्यांसाठी नियमित शैक्षणिक मार्गदर्शनपर व्हिडीओ पोस्ट करतात. या चॅनलला हजारो फॉलोअर्स आहेत. महाविद्यालयातील इतरही अनेक उपक्रमात त्यांचा सहभाग असतो. मानलेल्या भावाचा बचाव करताना विद्यार्थीप्रिय प्राध्यापिकेच्या जीवावर बेतणारा असा प्रसंग अपघाताने ओढवला शहरातील शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट क संयुक्त पूर्व परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ जानेवारी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकुण १२ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेसाठी एकूण २८५० उमेदवार बसलेले असून सदर परिक्षा सुरळीत पार पाडणेकरीता १२ उपकेंद्रप्रमुख, १२ मदतनीस, ४८ पर्यवेक्षक, १४६ समवेक्षक असे एकूण २१८ अधिकारी/ कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाव्दारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक ०६.०१.२०२६ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा केंद्राप्रमुख यांनी सदर परिक्षेचे अनुषंगाने प्रशिक्षण दिले.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार सदर परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा / अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे केवळ आवश्यक साहित्य उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील, तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणेबाबत याव्दारे सूचित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजे नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# दीनदयाळ बँकेची व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ जानेवारी**

मराठवाडयातील अंबाजोगाई येथील सांस्कृतीक उपक्रमात अग्रगण्य म्हटली जाणारी दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई दरवर्षी युगपुरुष विवेकानंदाचे जयंती काळात व्याख्यानमाला आयोजित करते या अनुषंगाने या व्याख्यानमालेचे आयोजन दिनांक १०,११,१२जानेवारी २०२६ ला केले असुन या वर्षीचे व्याख्याते श्री. पार्थ बावस्कर हे दिनांक १० जानेवारीला वंदे मातरम् या विषयावर बोलतील, दिनांक ११ जानेवारीला व्याख्याते श्री. डॉ. काशिनाथ देवधर हे भारतातील संरक्षण सिध्दता या विषयावर बोलणार असुन दिनांक १२ जानेवारीला श्री. दिपक करंजीकर हे राजकारणाचे होत असलेले गुन्हेगारीकरण व त्यावरील उपाय या विषयावर बोलणार आहेत.



हि व्याख्यानमाला सौभाग्य मंगल कार्यालय, अंबाजोगाई येथे आयोजीत केली असुन व्याख्यान मालेची रोजची वेळ सायंकाळी ६:३० राहणार आहे. या व्याख्यानमाले करीता नागरीकानी आर्वजुन उपस्थित रहावे हे अवाहन बँकेने केले आहे.

# बीड जिल्हा माहिती कार्यालयात दर्पण दिन साजरा



मराठीतील प्रथम वृत्तपत्र असलेल्या दर्पण च्या स्थापना दिनानिमित्त आज येथील जिल्हा माहिती कार्यालयात दर्पण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. येथील जिल्हा माहिती कार्यालया त झालेल्या या कार्यक्रमात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून स्थानिक पत्रकारांच्या उपस्थितीत अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

# अंबाजोगाईच्या मोहित परमार यांच्यावर बीसीसीआयची मोठी जबाबदारी; भारत-न्यूझीलंड सामन्याचे करणार मीडिया नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ जानेवारी**

येत्या ११ जानेवारी रोजी वडोदरा येथे भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात रंगणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (इउउख) मोठी घोषणा केली आहे. या महत्त्वाच्या सामन्याच्या मीडिया नियोजनाची जबाबदारी अंबाजोगाईचे भूमिपुत्र आणि क्रीडा अभ्यासक मोहित परमार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. बीसीसीआयच्या मीडिया नियोजन संघात त्यांची निवड झाल्याने अंबाजोगाईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

मोहित परमार यांना लहानपणापासूनच क्रिकेटची प्रचंड आवड आहे. त्यांनी २००७ पासून क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कामाला सुरुवात केली. अंबाजोगाईत त्यांनी 'अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमी' सुरू करून ग्रामीण भागातील खेळाडूंना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले. त्यांच्या या अकॅडमीतून आतापर्यंत ३९ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवली आहे, तर एका महिला खेळाडूने प्रतिष्ठेच्या 'महिला महाराष्ट्र प्रीमिअर लीग'मध्ये (WMPL) स्थान मिळवले आहे.



केवळ प्रशिक्षणच नव्हे तर क्रीडा पत्रकारितेतही परमार यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांना बीसीसीआयचे अधिकृत पत्रकार म्हणून मान्यता मिळाली होती. तसेच ते 'स्पोर्ट्स प्लस' या क्रिकेटला वाहिलेल्या वृत्तपत्राचे काम करतात. त्यांच्या याच अनुभवाची आणि क्रिकेट प्रति असलेल्या निष्ठेची दखल घेत बीसीसीआयने त्यांची निवड मीडिया नियोजन टीममध्ये केली आहे.

आगामी भारत-न्यूझीलंड सामन्याच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन आणि नियोजन करण्याची जबाबदारी आता मोहित परमार पार पाडणार आहेत. या निवडीबद्दल क्रिकेट वर्तुळातून आणि अंबाजोगाईकरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त बीड येथील नागेबाबा मल्टीस्टेटमध्ये पत्रकार तांदळे, श्रीकांत कुलकर्णी यांचा सत्कार करतांना गर्जे साहेब, शेख साहेब

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ जानेवारी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम (Short Term Employability Program - STEP) पंतप्रधान यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्रात अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम (Short Term Employability Program - STEP) चे उद्घाटन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाचा हा एक अभिनव उपक्रम असून हा कार्यक्रम महाराष्ट्र सरकारच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागामार्फत राबवला जात आहे. इंडस्ट्री ४.० च्या युगामध्ये आवश्यक तंत्रज्ञानाधिष्ठित कौशल्ययुक्त मनुष्यबळाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. राज्यातील इच्छुक पात्र उमेदवारांना तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) मधील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व सेवा क्षेत्रातील सुसंगत प्रशिक्षण देऊन औद्योगिक क्षेत्रास आवश्यक कुशल मनुष्यबळ पुरवणे या उद्देशाने महाराष्ट्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) व शासकीय तंत्र प्रशाला केंद्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन युगातील (New age) अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्रामध्ये पायाभूत सुविधांचा महत्तम उपयोग करून संस्थेच्या वेळेव्यतिरिक्त वेळेत अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य प्रशिक्षण योजना सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

# कै.राजाभाऊ चौसाळकर यांचे कार्य प्रेरणादायी - डॉ.शरदराव हेबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ जानेवारी**

सामाजिक कार्य करीत असताना कितीही संकटं, अनेक अडचणी आल्या तरी कै.राजाभाऊ चौसाळकर यांनी हसतमुखाने संघर्ष केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जडणघडणीत कै.राजाभाऊ चौसाळकर यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून त्यांनी सामाजिक दायित्व म्हणून काम केले. त्यांचा वारसा शिक्षकांनी जोपासला पाहिजे असे आवाहन इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ.शरदराव हेबाळकर यांनी केले.

येथील खोलेश्वर महाविद्यालयात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक सदस्य कै.राजाभाऊ दादा तथा बाळकृष्ण शिवाजीराव चौसाळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित आजी-माजी शिक्षक मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, ज्येष्ठ स्वयंसेवक तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक सदस्य तुळशीरामजी धायगुडे गुरूजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह बिपीनदादा क्षीरसागर, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरणदादा कोदरकर आदींची मंचावर उपस्थिती होती.



पुढे बोलताना डॉ.हेबाळकर यांनी भाग्यवान असलेल्या कार्यकर्त्यांनी संघाच्या जडणघडणीत काम केले. तुळशीरामजी धायगुडे कै.राजाभाऊ चौसाळकर, कै.खारकर गुरूजी, वैद्य गुरूजी, कोदरकर गुरूजी आदींनी ७५ वर्षांपूर्वी शिक्षण संस्था उभारून राष्ट्रभक्त व सुसंस्कारित पिढ्या घडविण्याचे कार्य केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जडणघणीत अनेक अडचणी आल्या परंतु, संघ कार्यकर्त्यांनी त्यावर मात करून सर्व लोकांना एकत्रित आणल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा संघ कार्यवाह बिपिनदादा क्षीरसागर यांनी आपले मनोगत मांडताना संस्थेच्या इतिहासातील आठवणींना उजाळा दिला तसेच संस्थेला वैचारिक दिशा देणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यापैकी कै.राजाभाऊ चौसाळकर यांनी संघाच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे काम केले असून राजाभाऊ दादा हे त्यांचे आयुष्य कणखरपणाने जगले. ते मनाने खंबीर होते. आज कुटुंबप्रमुखाचा स्मृतीसहळा त्यानिमित्ताने आजी-माजी शिक्षकांचा मेळावा खरोखरच अभिनव संकल्पना असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलुरकर यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये सांगितले कै.राजाभाऊ चौसाळकर यांनी केलेले कार्य महान आहेच. त्यांनी ते कार्य संघकार्याचे व्रत म्हणून केले. ते कार्य प्रखरपणाने व प्रभावीपणे केले. यापुढे शिक्षकांनी संघ स्वयंसेवकांची आदर्श प्रणाली घेऊन वाटचाल केली पाहिजे असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुचिता अतुलराव देशपांडे निवडून आल्याबद्दल सत्कार करण्यात आला तसेच ऑस्ट्रेलिया येथे मराठी शाळा स्थापन करून यशस्वीशिपणे चालवत असल्याबद्दल डॉ.कपिल चौसाळकर यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात केंद्रीय कार्यकारणी सदस्य सौ.कल्पनाताई चौसाळकर, सौ.वर्षाताई मुंडे, विष्णु सोनवणे, नितीन चौधरी तसेच प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष उन्मेष मातेकर, माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष अविनाश मुडेगावकर, सर्व संस्कार केंद्रप्रमुख, माजी सेवानिवृत्त कर्मचारी खोलेश्वर शैक्षणिक संकुल कर्मचारी आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह किरणदादा कोदरकर यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेश कंगळे व दत्तप्रसाद गोस्वामी यांनी केले तर वैयक्तिक पद्य प्रा.शैलेश पुराणिक यांनी सादर केले कार्यक्रमाचे आभार डॉ.गोपाळ चौसाळकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने करण्यात आली.

# विद्यार्थिनीच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी सीआयडी चौकशी करावी-दयानंद स्वामी

## अन्यायग्रस्त कुटुंबाने भेटी दरम्यान केला घटनेचा धक्कादायक खुलासा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ जानेवारी**

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील टाका येथील नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी अनुष्का किरणकुमार पाटोळे हिचा वस्तीगृहात झालेला मृत्यू अत्यंत संशयास्पद असून औसा व मालेगाव सारख्या दलितांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना चिंताजनक असून याप्रकरणी सीआयडीमार्फत सखोल चौकशी करून संबंधित आरोपींवर भारतीय दंड विधान कलम ३०२ (खून) अंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी रा. कॉ. पक्षाचे (अप) प्रदेश सरचिटणीस दयानंद स्वामी यांनी मागणी केली आहे.

घटनेनंतर औसा येथील अन्यायग्रस्त कुटुंबाची रा. कॉ. पक्षाचे (अप) प्रदेश सरचिटणीस दयानंद स्वामी यांनी भेट घेतली यावेळी आझाद क्रांती सेनाचे राजेश घोडे, वंचित बहुजन आघाडीचे नेते धम्मानंद साळवे, आसिफ पटेल यांची उपस्थिती होती. भेटीदरम्यान कुटुंबीयांनी दिलेली माहिती अत्यंत धक्कादायक असून अनुष्काच्या मृत्यूबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मृतदेहाच्या स्थितीवरून हा प्रकार आत्महत्येचा वाटत नसून, तिच्या अंगावर जखमांच्या खुणा असल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे. तसेच कुटुंबीयांची कोणतीही परवानगी न घेता तिचा मृतदेह वस्तीगृहातून उचलण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. धक्कादायक बाब म्हणजे, कुटुंबीयांना ती जिवंत आहे असे सांगून हॉस्पिटलला नेत असल्याचे सांगण्यात आले; मात्र जिवंत मुलीला रुग्णवाहिकेत न नेता वाहनाच्या डिकीत टाकण्याचे कारण काय, असा गंभीर सवाल उपस्थित करण्यात आला आहे.



या सर्व बाबी पाहता हा मृत्यू पूर्णतः संशयास्पद असल्याचे स्पष्ट होत आहे.या प्रकरणात स्थानिक तपास यंत्रणेची भूमिका संशयास्पद असल्याने सदरील गंभीर प्रकरणाची निष्पक्ष तपासासाठी सीआयडीमार्फत चौकशी करण्यात यावी व दोषींवर तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी दयानंद स्वामी यांनी केली आहे.

# राज्य सेवा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करा– डॉ किरण जाधव




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

राज्य सेवा हमी कायदा हा जनतेच्या हक्कांना जपणारा महत्त्वाचा कायदा असून प्रशासन नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचावे, या उद्देशाने तो लागू करण्यात आला आहे. जनतेला पारदर्शकपणे व विहित कालमर्यादेत सेवा मिळणे आवश्यक असून, येणाऱ्या काळातही शासकीय अधिकाऱ्यांनी अधिक संवेदनशीलता व तत्परतेने सेवा द्यावी, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, सहायक जिल्हाधिकारी तथा गटविकास अधिकारी योगेश-कुमार मीना आदी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. जाधव यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेला अधिक गतिमान, पारदर्शक व कालमर्यादेत सेवा देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय विभाग व प्राधिकरणांच्या एकूण १२१२ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून, त्याचा लाभ नागरिकांना दिला जात आहे. हिंगोली जिल्हा हा छत्रपती संभाजीनगर विभागात सेवा पुरवठ्यात पहिल्या क्रमांकावर असून, ९० टक्क्यांहून अधिक सेवा पूर्तता केल्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे त्यांनी कौतुक केले.

चांगले कार्य करणाऱ्या प्राधिकाऱ्यांचा राष्ट्रीय दिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते गौरव करावा, तसेच आगामी काळातही हिंगोली जिल्हा राज्यात अग्रक्रमांकावर राहावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये तात्काळ आपले सरकार सेवा केंद्रांवर अधिसूचित सेवा सुरू कराव्यात व अधिकाधिक आदर्श सेवा केंद्रे उभारावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. लोकसेवा हक्क अधिनियम टप्पा-२ चे काम सुरू असून, लवकरच अधिक गतीने नागरिकांना सेवा उपलब्ध होतील, असेही त्यांनी सांगितले.

हा कायदा जनतेसाठी अत्यंत उपयुक्त असून, प्रत्येक कार्यालयाच्या दर्शनी भागात अधिसूचित सेवा व त्यासाठीची कालमर्यादा दर्शविणे बंधनकारक आहे. दिलेल्या कालमर्यादेत सेवा न दिल्यास संबंधित अधिकाऱ्यावर ५०० ते ५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असल्याचेही आयुक्त डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले. प्रथम व द्वितीय अपिलाची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी आयुक्तांनी गतवर्षभरातील लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत विविध विभागांनी दिलेल्या सेवांचा सविस्तर आढावा घेतला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यात सेवादूत उपक्रम, व्हॉट्सअॅप आधारित तक्रार निवारण प्रणाली व 'हिंगोली कलेक्टर चॅनल'द्वारे नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्यात येत असल्याची माहिती दिली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड यांनी जिल्हा परिषदेमार्फत अधिसूचित सेवांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. जिल्हा समन्वयक गंगाधर लोंढे यांनी जिल्ह्यातील अधिसूचित सेवा, उपक्रम व प्रकरण निपटाऱ्याबाबत सादरीकरण केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन महसूल विभागाचे तहसीलदार आश्विनकुमार माने यांनी केले. बैठकीस विविध विभागांचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा वार्षिकच्या प्रारूप आराखड्याचे प्रस्ताव सादर करा– गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ चा प्रारूप आराखडा अद्याप सादर न केलेल्या सर्व विभागांनी तात्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दायित्व व निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव तसेच जनसुविधांशी संबंधित दायित्वाचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विविध विकास योजनांतील निधी वितरणासाठी संबंधित विभागांनी दायित्वाचे प्रस्ताव आयपास प्रणालीवर अपलोड करणे अनिवार्य असून, प्रस्ताव अपलोड न झाल्यास निधी वितरित करण्यात येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. वितरित निधी विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने खर्च करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

या बैठकीत सन २०२५-२६ मधील नवीन कामांच्या प्रशासकीय मान्यता, निधी वितरण प्रक्रिया, सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, पायाभूत सुविधा प्रकल्पांना युनिक आयडी देणे तसेच पुनर्विनियोजन प्रस्ताव यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांसाठी महाराष्ट्र असेट रजिस्ट्रेशन सिस्टीम पोर्टलवरून युनिक आयडी घेण्याची कार्यवाही अनेक विभागांनी अद्याप सुरू न केल्याचे निदर्शनास आले. याबाबत दोन दिवसांत कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

आरोग्य व शिक्षण विभागांनी सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व महाविद्यालयांचे जीओ- मॅपिंग पूर्ण करून माहिती अपलोड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच सर्व विभागांनी जनपरिचय पोर्टलवरील नोंदणी पूर्ण करून पीएम गतिशक्ती पोर्टलवर प्रकल्पांची माहिती अपलोड करावी व प्रगती अहवाल तात्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

दरम्यान, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ (सुधारित २०१५) अंतर्गत अत्याचाराच्या प्रकरणांतील मृत पीडितांच्या वारसांना शासकीय/निमशासकीय सेवेत गट-ड मधील नोकरी देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्राप्त प्रस्तावांवर चर्चा करून पात्र प्रस्तावांना तहसीलदारांचे वारस प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली.या बैठकीस मुख्य कार्यकारी विवेक गायकवाड, समितीचे सदस्य सचिव तथा समाज कल्याण सहायक आयुक्त गीता गुठ्ठे व समितीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

# सीईओंच्या उपस्थितीत बालिका आरोग्य मेळाव्याचा समारोप




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

देसाई फाउंडेशन ट्रस्ट, गुजरात आणि उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांति ज्योति सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका आरोग्य मेळावा घेऊन पू. अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालय वसमत येथे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन समृद्धी दिवाणे, शिक्षणअधिकारी संदीप सोनटक्के, जिल्हा आरोग्य अधिकारी कैलास शेळके, गट विकास अधिकारी प्रफुल तोटेवार, उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव, कार्यक्रम एक्झिक्युटिव शितल कांबळे, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बी. डी. कदम (बाराशीव हनुमान ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ संस्था), सुशिला पाईकराव, तानाजी भोसले, अॅड. अनुराधा पंडीत, सरिता पंतगे (प्राचार्य), अॅड. रणधीर तेलगोटे, विशाल अग्रवाल, गटशिक्षण अधिकारी सतीश काष्टे उपस्थित होते. बालिका आरोग्य मेळाव्यात सर्व विद्यार्थिनींचे दंत तपासणी करण्यात आली. हिमोग्लोबीनची तपासणी करण्यात आली. रक्तक्षयग्रस्त विद्यार्थिनिना तीन महिन्याचे औषध देण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून आरोग्य विषयी माहिती देण्यात आली. तसेच बालविवाह विषयी माहिती देऊन बालविवाह प्रतिबंधक शपथ घेण्यात आली. विजेते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकल्प संचालक दिशांत पाईकराव, सिद्धार्थ निनुले, बुद्धभूषण पातोडे, डॉ. संदीप घुगे, डॉ. ऋतुजा घुगे, स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यकमाचे सूत्रसंचालन विकास कांबळे यांनी केले तर आभार मिटकर यांनी मानले.



**हिंगोली– भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे शहरातील जलेश्वर तलावातील गाळ काढण्यात आला तसेच सौंदर्यीकरण केल्यामुळे तलावात जानेवारी महिन्यातही मोठा पाणीसाठी शिल्लक आहे. त्यामुळे तलाव परिसर अत्यंत रमणीय दिसत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पवार पब्लीक स्कूलची शैक्षणिक सहल

हिंगोली– येथील पवार पब्लिक स्कुलच्या युकेजी ते तिसरीतील ६० विद्यार्थ्यांची सहल परभणी येथे बुधवारी गेली होती. या सहलीत विविध खेळण्याचा मनमुराद पणे आनंद लुटला. या काढण्यात आलेल्या सहलीत विद्यार्थ्यांनी गार्डनमधील वेगवेगळ्या खेळण्याचा आनंद घेत मजा लुटली तसेच तेथील मॅजिक शो व डान्स शो हा विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा भाग ठरला. मुलांनी तेथे वेगवेगळ्या फळांचा तसेच आहाराचा उपभोग घेतला. मुलांनी येथे वेगवेगळे गेम्स खेळून तसेच मनोरंजनाच्या स्पर्धा खेळून आनंद घेतला. या सहलीमध्ये एकूण ६२ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, कोमल अग्रवाल, सॉली केसी, दीपाली राऊत, अपर्णा जामकर, दिपाली मुदिराज, ठाकरे, धनवे, फिजा सय्यद, सचिन धामणे, पंकज इंगोले, सचिन इंगोले, योगेश थोरात, गजानन वानरे, जॉबीन, पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर, आदींची उपस्थिती होती.

### महामानवांचे विचार अंगीकारा– अग्रवाल



हिंगोली– स्वातंत्र्य सेनानी तथा सर्वोदय विचारवंत गंगाप्रसादजी अग्रवाल यांचा वैचारिक वारसा जपण्यासाठी महामानवांचे विचार अंगीकार करावे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी दि. ७ जानेवारी बुधवारी येथे केले. स्वातंत्र्यसेनानी तथा सर्वोदय विचारवंत गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या १०३ व्या जयंती निमित्त शहरातील मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध विद्यालयात प्रबोधनपर व्यसनमुक्ती उपक्रम पार पडला. नशामुक्त भारत अभियान समितीचे अशासकीय सदस्य श्याम सोळंके, नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक विशाल अग्रवाल, मुख्याध्यापक पिंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. महामानवांचे व्यसनमुक्तीपर चित्र प्रदर्शनीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे महावाक्य निदर्शनास आणून देण्यात आले. तंबाखू-तंबाखुजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत विवेचन करण्यात आले. तंबाखू पदार्थांचे दहन करण्यात आले. निवासी विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका, कर्मचार्यांची उपस्थिती होती.

### ग्रामसेवकास जीवे मारण्याची धमकी

हिंगोली-सुकळी खुर्द येथील ग्रामसेवक गजानन रामभाऊ वाकळे यांना हे त्यांच्या खाजगी कार्यालयात काम करीत असतांना लक्ष्मण कबाडी हा इसम कार्यालयात आला. त्याने नमुना नं ८ मागितला. त्यानंतर इतर मालमत्ता धारकाचे फोटो काढीत असतांना त्याला रोखले असता त्याने ग्रामसेवकास जातीवाचक शिवीगाळ करीत जीवे मारण्याची तक्रार सेनगाव पोलिसात दिली आहे.

# सापटगाव येथे तमाशात गोंधळ झाल्यामुळे तमाशाचे फड उठवले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

सेनगाव तालुक्यातील कोळसा आणि सापटगाव येथे मागील काही दिवसांपासून खंडोबाची यात्रा सुरू झाली आहे. याठिकाणी तमाशाचे फडात मंगळवारी रात्री काही अज्ञातांनी गोंधळ घातल्यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी तमाशाचे फड उठविण्यास सुरूवात केली आहे.

सेनगाव तालुक्यातील कोळसा आणि सापटगाव येथील यात्रा सर्वदूर प्रसिध्द आहे. या यात्रेत परिसरातील हजारो लोक येतात. या यात्रेत लाखोंची उलाढाल होत असते. खंडोबाच्या दर्शनासाठी लोक मोठ्या संख्येने दररोज येत आहेत.

दरम्यान, या ठिकाणी काही कलाकारांनी तमाशाचे फड आणले परंतु दिवसादेखील काही आंबट शौकीन या फडामध्ये येत असल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. मंगळवारी रात्री तमाशात गोंधळ झाल्यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. सेनगाव पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करीत या फडांना त्याठिकाणाहून उठविण्यास सुरूवात केली आहे.

# भरोसा सेल, दामिनी पथकांमार्फत विद्यार्थीनींना कायदेविषयक माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

पोलिस वर्धापन सप्ताह निमित्त समाजकल्याण मुलींचे वसतिगृह , नाईक नगर येथील विद्यार्थिनींनी पोलिस अधीक्षक कार्यालय येथे भेट दिली तसेच पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांचा सत्कार केला. यावेळी भरोसा सेल व दामिनी पथकाच्यावतीने सुरक्षाविषयक कायद्यांची माहीती देण्यात आली.

याप्रसंगी इयत्ता ८ वी ते १० वी च्या वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थिनींना भरोसा सेल व दामिनी पथक बाबत तसेच महिला सुरक्षाविषयक कायद्यांची माहिती देऊन आपत्कालीन परिस्थीत स्वतःचा बचाव कसा करायचा व आपत्कालीन क्रमांक १०९८ व ११२ इत्यादी विषयक माहिती दिली व कोणत्याही परिस्थिती मध्ये बालविवाह करू नये केल्यास त्याचे मुलींच्या मानसिक व शारीरिक स्थितीवर होणारे दुष्परिणाम आणि कुटुंबावर दाखल होणारे गुन्हे.. इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले. या प्रसंगी पोलीस अधीक्षक नीलभ रोहन यांनी मुलींना उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी होणेबाबत व स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन केले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी गृह केंद्रे तसेच भरोसा सेल, दामिनी पथक येथील उपनि जगताप, शेख, सरनाईक महिला अंमलदार पेंदोर, चव्हाण, पाटील, शिंदे, साळवे इत्यादी. उपस्थित होते.

# जनगणना २०२७ पूर्वतयारीबाबत प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

जनगणना २०२७ च्या अनुषंगाने पूर्वतयारी करण्यासाठी आज, दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता घरयादी गटांची रचना कशी करावी या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणासाठी मुंबई येथील जनगणना कार्यालयाचे सहाय्यक संचालक प्रविण भगत, तसेच सांख्यिकी अन्वेषक श्रेणी-ख अरुण सालगावकर यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात घरयादी गटांची रचना, कार्यपद्धती तसेच आगामी जनगणनेसाठी आवश्यक बाबींची सविस्तर माहिती देण्यात आली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, चार्ज ऑफिसर म्हणून तहसीलदार, सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, नगररचना अधिकारी, तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार अश्विनकुमार माने, नायब तहसीलदार डी. एस. जोशी, एल. जी. तोटावाड, संबंधीत महसूल सहाय्यक वहिदा काझी तसेच विविध कार्यालयांतील जनगणना कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकारी व रचना सहाय्यक उपस्थित होते. जनगणना २०२७ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ही पूर्वतयारी महत्त्वाची असून प्रशिक्षणामुळे सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# हाडातील कॅल्शियम, युरिक ॲसिड मोफत तपासणी शिबीराला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जानेवारी**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, हिंगोली तसेच छत्रपती मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, हिंगोली यांच्या संयुक्त सहकार्याने नागरिकांसाठी हाडातील कॅल्शियम तपासणी व युरिक ॲसिड मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. संदीप शिंदे, डॉ. राम आसोले, डॉ. नामदेव कोरडे, डॉ. मनीष बगाडिया यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच समाजसेवा अधीक्षक डॉ. संतोष शेंडगे व आदिल पठाण यांनी शिबिराच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे हाडांचे आजार व युरिक ॲसिड संदर्भातील आजारांचे लवकर निदान होऊन नागरिकांना मोठा लाभ झाला. या शिबिरात ३६ रुग्णांनी सहभाग नोंदवला. शिबीराला उत्तम प्रतिसाद मिळाला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देगलूर नगराध्यक्षपदी विजयमाला टेकाळे तर उपनगराध्यक्षपदी ॲड. अंकुश देसाई

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ७ जानेवारी-**

देगलूर नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने एकहाती सत्ता प्रस्थापित करून आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सौ. विजयमाला बालाजी टेकाळे यांनी नगराध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारले तर ॲड. अंकुश सुरेशराव देसाई हे उपनगराध्यपदावर विराजमान झाले आहेत.

देगलूर नगर परिषदेचे राजकीय समीकरण बदलवत राष्ट्रवादी काँग्रेसने नगराध्यक्ष पदासह १५ जागांवर विजय मिळवत पालिकेवर आपली सत्ता मजबूत केली आहे. या पार्श्वभूमीवर आज ७ जानेवारी (बुधवार) रोजी आयोजित पदग्रहण सोहळ्यात नगराध्यक्षापदाचा सौ. विजयमाला बालाजी टेकाळे यांनी तर उपनगराध्यक्ष पदाचा ॲड. अंकुश सुरेशराव देसाई देगावकर यांनी पदभार स्वीकारला.या वेळी आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह माजी आ. अविनाश घाटे, माजी आ. सुभाष साबणे, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यात विकास, पारदर्शकता आणि लोकाभिमुख प्रशासन या मुद्यांवरच पुढील राजकारण केले जाईल असा विश्वास उपरोक्त मान्यवरांनी व्यक्त केला.

**२८ वर्षानंतर देसाई घराण्याची कमबॅक**

नगररिषद राजकारणाच्या पटावर देसाई कुटुंबाचा ठसा




काही नवा नाही .सन १९९७ मध्ये दिवंगत ज्येष्ठ विधीतज्ञ सुरेशराव जयवंतराव देसाई यांनी उपनगराध्यक्ष पद भूषवून प्रशासनावर आपली कायदेशीर पकड, अभ्यासू नेतृत्व आणि नीतिमान राजकारणाची छाप उमटवली होती. दुर्दैवाने सरत्या वर्षात त्यांचे निधन झाले मात्र त्यांचा वैचारिक वारसा आजही देगलूरच्या राजकारणात जिवंत आहे. त्या वारसाचा झेंडा खांद्यावर घेत युवा नेते ॲड. अंकुश देसाई देगावकर यांनी सलग चार टर्म नगरसेवक म्हणून केलेली दमदार कामगिरी जनतेशी असलेले नाळ आणि नगर हितासाठी घेतलेले निर्णय आज निर्णायक ठरले. तब्बल २८ वर्षानंतर देसाई कुटुंबाला पुन्हा उपनगराध्यक्ष पदाची संधी मिळणे म्हणजे हा केवळ पदभार नाही तर राजकीय सातत्य आणि जनतेच्या विश्वासाचा विजय आहे. एकूणच पित्याने रोवलेला राजकीय दीपस्तंभ पुत्राने पुन्हा उजळवत देगाव गावाचा मान उंचावणारी ही पिता - पुत्रांची परंपरा आज संपूर्ण तालुक्यात चर्चाचा विषय ठरली असून देसाई घराण्याच्या नेतृत्वाला जनतेकडून अभिनंदनचा वर्षा होत आहे. हे मात्र विशेष...!

**निवडणूक संपली आता मतभेद संपले!**

तेलंगणा कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्याच्या त्रिसीमेवर वसलेल्या देगलूरचा सर्वांगिण विकास करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही असे, आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले. निवडणूक संपली आता मतभेद संपले, याप्रमाणेच काँग्रेस पक्षाकडून निवडून आलेल्या नगरसेवकांचे मानसन्मान केले जाईल असेही चिखलीकर म्हणाले.

**वचननाम्याची पुर्तता करण्यास प्राधान्य देणार**

देगलूर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा लक्ष्मीकांत पदमवार म्हणाले की, नगरपरिषदेच्या निवडणूकीत जनतेनी आम्हाला सांभाळले आता आम्हाला त्यांची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. वचननाम्यात दिलेल्या घटकांचा प्राधान्याने पुर्ती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करु, जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे पदमवार यांनी सांगितले.

**काँग्रेसचा एक तर राष्ट्रवादीचे दोन स्वीकृत सदस्य**

पक्षीय संख्याबळानुसार काँग्रेस पक्षाकडून माजी उपनगराध्यक्ष अविनाश मष्णाजी निलमवार यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून संतोष मधुकर नारलावार आणि सय्यद मोहियोद्दीन या दोघांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. देगलूर नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसने मिळवलेल्या बहुमतावर सत्तेची सूत्रे हातात घेतली असून आता देगलूरच्या विकासाला गती द्यावी अशी रास्ता अपेक्षा शहरवासीयातून व्यक्त केली जात आहे.

# नांदेड महानगरपालिकेचा महापौर हा भाजपचाच राहील : प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ जानेवारी-**

नांदेड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या प्रचारार्थ दिनांक ६ जानेवारी रोजी सिडको येथे झालेल्या प्रचार सभेत प्रभाग क्रमांक १९ व २० या प्रभागातील एकूण नऊ उमेदवार च्या प्रचारात मतदारांना संबोधित करताना राज्यचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नागरिकांच्या मूलभूत सुविधा या घटकावर फोकस करत राज्यचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरगरीब जनतेला दिलासा दिला आहे. तेव्हा त्यांच्या हाताना बळकटी देण्यासाठी दोन्हीही प्रभागातील भारतीय जनता पार्टीचे नऊ उमेदवारना निवडून देण्याचे आवाहन केले.

स्थानिक स्वराज्य संस्था नांदेड मनपाच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ या निवडणुकीची रणधुमाळणी चालू झाली असताना नांदेड मनपा प्रभाग क्रमांक १९ व २० साठी सिडको येथे दिनांक सहा जानेवारी रोजी प्रचार सभा घेण्यात आली या सभेत राज्याचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी येथील नागरिकांच्या



अनेक मूलभूत समस्या नाली रस्ते पतदिवे पिण्याचे स्वच्छ पाणी अशा अनेक मूलभूत समस्या दूर करण्याचे आश्वासन दिले यावेळी या प्रचार सभेस संबोधित करताना राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांनीही नांदेड जिल्ह्यातील गोरगरीब रोजगार यांचे प्रश्न मार्गी लावणार व सिडकोतील घर हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी लावणार तसेच सिडकोच्या औद्योगिक वसाहतीतील बंद पडलेले उद्योग धंदे पूर्ववत चालू करून असे आश्वासन दिले याचवेळी खासदार डॉ.अजित गोपखेडे, चित्रा वाघ यांनी आपल्या भाषणातून जनतेच्या सुख सुविधेसाठी आम्ही सतत प्रयत्न करून जनतेची सेवा करू ही सेवा करण्याची संधी आम्हाला दोन्ही प्रभागांमधील नऊ उमेदवार कमळ या निशाणी वर बटन दाबून निवडून द्या ! बाकी आम्ही तुमच्या सेवेत राहू असे मत व्यक्त केले.यावेळी प्रभाग क्रमांक १९चे उमेदवार अभिषेक सौदे,मोरे दिपाली संतोष,काकडे सुलोचना धोंडीबा,काळे अनुराधा राजू तसेच प्रभागक्रमांक २० मधील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार अनुसूचित जाती निरंजना राजू लांडगे, नामाप्र महिला मंगला गजानन देशमुख, नामाप्र वैजनाथ ईश्वरराव देशमुख, सर्वसाधारण महिला सुवर्ण सतीश बसवदे, सर्वसाधारण संजय शिवाजीराव घोगरे उमेदवारांची उपस्थिती होती तर या मंचावर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ.अजित गोपछडे, चित्रा वाघ, श्री जया चव्हाण, अमर राजूरकर ,संतुकराव हंबर्ड, दिलीप कंदकुर्ते, डॉ. करुणा जमदाडे, माजी जी. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या सह आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. या सभेचे प्रास्ताविक संजय पाटील घोगरे यांनी केले तर सूत्रसंचालन धीरज स्वामी यांनी केले.

## पत्रकारांचा सन्मान तर महामंडळास पत्रकारांच्या वतीने सुरक्षेच्या सूचना सुपूर्द

**हदगाव** -आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत हदगावचे पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांनी पत्रकार बांधवांचा



यथोचित सत्कार केला तर पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकारांच्या संयुक्त विद्यमानाने प्रवाशांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या सूचनांचे संकलन करून एका पेन ड्राईव्ह मध्ये साठवून महामंडळास यावेळेस सुपूर्द करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक संकेत दिघे, महामंडळाचे कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे निमित्त पोलीस निरीक्षक संकेत दिघे व त्यांच्या सर्व कर्मचारी बांधवांच्या वतीने पत्रकारांचा यथोचित सत्कार व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती त्यानंतर लगेच सगळे मान्यवर हे महामंडळाकडे रवाना होऊन प्रवाशांना प्रवास करताना पाळव्याच्या आवश्यक त्या संपूर्ण सूचना आपली मौल्यवान वस्तू, मोबाईल, रोख रक्कम, दाग-दागिने इत्यादी चोरांपासून सावध राहावे हे २४ तास ध्वनीपेशकावर वरून प्रवाशांना सुचित करण्यात येणार आहेत त्यामुळे हे वारंवार एकूण त्यांचे प्रवास करते वेळेस लक्ष दुर्लक्षित होणार नाही व त्यांचा प्रवास सुकर व सुरक्षित होणार असून या राबविलेल्या उपक्रमाबद्दल प्रवाशातून समाधान व्यक्त होत आहे. दोन्ही ठिकाणी पत्रकार बांधव, महामंडळाचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## बाऱ्हाळीत सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ

**बाऱ्हाळी** -कुठलाही व्यापार करत असताना व्यापाऱ्यांनी आपण आपल्या कुवतीनुसारच व्यापार करावा अन्यथा त्याचा वाईट परिणाम आपल्या व्यापारावर होऊ शकतो. असे प्रतिपादन मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती खुशालराव पाटील उमरदरीकर यांनी बाऱ्हाळी येथील सोयबीन हमीभाव खरेदी केंद्र शुभारंभ प्रसंगी केले.



मुखेड तालुक्यातील नांदेड - बिदर जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग १६१ अ रोडवर बापशेटवाडी फाटा येथील अशोक वाघमारे कॉम्पलेक्स येथे बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ रोजी नाफेड व मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हमीभाव योजना (पी.एस.एस. २०२५ - २६) सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजन देशपांडे व भाजप जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती खुशालराव पाटील उमरदरीकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रशेखर देशमुख, दिनेश आवडके, बालाजी पाटील सकनुर, व्यंकटराव जाधव वसुर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष पदावरून बोलताना खुशालराव पाटील उमरदरीकर म्हणाले की, शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये व हमीभाव मिळावा म्हणून तालुक्यात नाफेड व मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आजपर्यंत १२ खरेदी केंद्र सुरू करण्यात आले असून आणखी १२ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सांगितले. बाऱ्हाळी येथील व्यापारी शिवराज विजापुरे व बालाजी सोमावार यांनी सुरू केलेले सोयाबीन खरेदी केंद्र तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी नक्कीच फायदेशीर ठरणार असल्याची प्रतिक्रिया राजन्न यांनी व्यक्त केली. यावेळी बालाजी पाटील सकनूरकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम प्रसंगी चेअरमन व्यंकट पाटील उमाटे, उपसरपंच व्यंकट पाटील वळगे, जगन्नाथ तरगुडे, किरण पाटील जाहुर, संजय रावणगावकर, अशोक वाघमारे मांजरी , सतिश महाजन, योगीराज पवार, परिसरातील शेतकरी, व्यापारी व पत्रकार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी सोमावार सावकार यांनी केले .

## मारोती घुमाळ व नारायण लुटे यांचा भाजपामध्ये प्रवेश

**नवीन नांदेड** -असरजन येथील शिवसेनेचे माजी संघटक मारोती धुमाळ व काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस नारायण लुटे यांनी माजी मुख्यमंत्री



तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. नांदेड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या रणधुमाळणत उमेदवारी मिळण्याच्या व इतर काही कारणावरून निष्ठावंत कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करून भारतीय जनता पार्टी मध्ये पक्षप्रवेश कारण्यात आले आहेत.सिडको हाडको भागातील मनपा प्रभाग क्रमांक १९ मधील भाजपा पक्षाच्या उमेदवारांचा प्रचारासाठी ६ जानेवारी रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी असरजन येथे बैठकीसाठी आले असता माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे,माजी नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेचे मारोती घुमाळ यांच्या सह नारायण लुटे यांनी भाजपा पक्षात प्रवेश केला यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. जुना कौठा,असरजन,धुमाळवाडी येथे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या यावेळी विविध ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.

# जुगार अड्डे फोफावत असताना रामतिर्थ पोलीस यंत्रणा झोपेत?

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ७ जानेवारी-**

नरसी पासून जवळ असलेल्या रामपुर परिसरात बेकायदेशीर धंदे खुलेआम सुरू असताना प्रशासन गाफील असल्याची चर्चा रंगत असतानाच रामतीर्थ पोलिसांनी अखेर रामपुर येथे विनापरवाना सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापाटाकत पाच जणां ना रंगेहात पकडले. ही कारवाई उशिरा का होईना, पण झाली, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

नायगांव बाजारपासून जवळच असलेल्या मौजे रामपुर गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पत्र्याच्या शेडजवळ बेकायदेशीररित्या जुगार खेळत व खेळवित असल्याची गोपनीय माहिती रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळेनां मिळाली.

माहितीची गांभीर्याने दखल घेत त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांनी पथकासह दि. ६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास छापा टाकला.

या छाप्यात शंकर बाबु निलमवार (वय ३५, रा. पाचपिंपळी), चंद्रकांत ज्ञानोबा शेळके (वय ३२), योगेश अशोक रामपुरे (वय २८), विठ्ठल मारोती इंगळे (वय ३५, रा. आदमपुर)




व नितीन मारोती गजभारे (वय ३२, रा. कुंटुर) हे जुगार खेळताना व खेळवताना आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून जुगारासाठी वापरलेले बदक छाप पत्ते तसेच ५ हजार ५५० रुपये रोख असा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मात्र या कारवाईनंतर नागरिकांमध्ये केवळ समाधान नव्हे, तर संतापाचीही भावना दिसून येत आहे. जुगार अड्डे एका दिवसात उभे राहत नाहीत. हे धंदे वाढत असताना याआधी कारवाई का झाली नाही? असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

जुगारामुळे अनेक घरांचे संसार उद्ध्वस्त होत असताना, तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असताना प्रशासनाने वेळीच डोळे उघडणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. सपोनि विक्रम हराळे यांनी अवैध जुगार, दारू विक्री व अन्य गैरप्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा दिला असला, तरी ही कारवाई सातत्यपूर्ण व निर्भीड असावी, अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

कायद्याची भीती निर्माण व्हायची असेल तर अधूनमधून छापे टाकून चालणार नाहीत, तर अवैध धंदे मुळासकट उखडून टाकण्याची ठोस भूमिका घ्यावी लागेल, अशी ठाम भावना आता रामपुरसह नायगाव परिसरात उमटत आहे.

# प्रभाग क्रमांक ६ मध्ये अटीतटीची लढत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ जानेवारी-**

नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक सहामध्ये चुरशीची आणि अटीतटीची लढत सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून क्षितिज जाधव यांच्या पत्नी प्रवेशिका क्षितिज जाधव यांनी निवडणूक रिंगणात उतरून प्रतिस्पर्ध्यांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. त्यांच्या प्रचाराला प्रभागातील नागरिकांसह विविध सामाजिक, विविध आघाड्यांचा संघटनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या बारा वर्षांपासून विविध संघटनात्मक पदांवर कार्यरत असलेले क्षितिज जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यसम्राट आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नेतृत्व आणि कार्याध्यक्ष माधव पावडे यांच्या सूक्ष्म नियोजनातून प्रभावी प्रचारयंत्रणा राबवली जात आहे. रॅली, कॉर्नर मीटिंग, प्रचार सभा तसेच घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेत त्यांच्या समस्या जाणून घेण्यावर भर दिला जात आहे. या प्रचारात विधानसभा अध्यक्ष संतोष शिरसागर आणि महानगराध्यक्ष ओमप्रकाश पोखरणा यांनीही आपली संपूर्ण ताकद लावली असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते प्रभागात सक्रिय झाले आहेत.

या प्रभागात काँग्रेसकडून तीन वेळा निवडून आलेले भवरे कुटुंब व. आणि नुकताच भाजपा मध्ये. पक्षप्रवेश करून तिकीट मिळवलेले शीला भवरे, हे प्रवेशिका जाधव यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. मात्र, मागील पंधरा वर्षांतील त्यांच्या कार्यकाळात प्रभागात अपेक्षित विकास न झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काही भागात तर नागरिक लबाड लांडगा ढोंग करताय विकास केल्याचा सोंग करतय अशा प्रतिक्रिया सामान्य नागरिकांमध्ये उमटत आहे.

## मध्यान्ह भोजनात आळ्या; मुख्याध्यापक निलंबित

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ७ जानेवारी-**

येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनातील सोयाबीनच्या भाजीमध्ये चक्क आळ्या आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाआहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत किनवट येथील गटशिक्षण अधिकारी अनिल महामुने यांनी शाळेला भेट देत प्रत्यक्ष चौकशी केली.

चौकशीत प्रभारी मुख्याध्यापक गजानन घनशाम पाटील यांचा निष्काळजीपणा व गंभीर स्वरूपाची कृती निदर्शनास आल्याने त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. संबंधित कृती ही जिल्हा परिषद सेवा वर्तणूक नियम १९६७ मधील नियम क्रमांक तीनचा भंग करणारी असल्याने त्यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

# जिर्ण अंगणवाड्यांची दुरुस्ती करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ७ जानेवारी-**

माहूर शहरातील अंगणवाडी केंद्रांची दयनीय अवस्था लक्षात घेता जिर्ण अंगणवाड्यांची दुरुस्ती, नूतनीकरण तसेच सुशोभिकरण श्री रेणुकादेवी संस्थानच्या माध्यमातून करून द्यावे, अशी मागणी माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांना निवेदन सादर केले.

माहूर शहरात नागरी प्रकल्पांतर्गतएकूण१५अंगणवाड्या कार्यरत असून सुमारे ५०० बालके येथे शिक्षण घेत आहेत. यापैकी बहुतांश अंगणवाड्या भाड्याच्या इमारतींमध्ये चालविल्या जात असून, ग्रामपंचायत काळात बांधलेल्या दोन अंगणवाडी इमारती सध्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे चिमुकल्या बालकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या संदर्भात संबंधित वरिष्ठ कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ठोस दखल घेतली गेलेली नाही. परिणामी, श्री रेणुकादेवी संस्थान माहूर यांनी पुढाकार घेऊन जिर्ण अंगणवाड्यांची दुरुस्ती, नूतनीकरण व सुशोभिकरण करून द्यावे, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी आज दिनांक ६ जानेवारी रोजी प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांच्याकडे केली.

यावेळी रेणुकादेवी संस्थानचे पदसिद्ध सचिव तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला, कोषाध्यक्ष तथा माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप,विश्वस्त चंद्रकांत भोपी,संजय कान्नव उपस्थित होते.

# कोलंबी ग्रामपंचायतीचा विकासाचा आदर्श प्रयोग

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ७ जानेवारी-**

तालुक्यातील कोलंबी गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सर्वांगीण विकासाची नवी दिशा दिसून येत असून, गावाने विकासाचा आदर्श निर्माण केला आहे. या अभियानाअंतर्गत कोलंबी गावात स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, हरित विकास व डिजिटल सेवा यावर भर देत विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले.

गावात व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात येऊन नाल्यांची साफसफाई करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली. ग्रामपंचायत डिजिटल करून 'आपले सरकार सेवा केंद्र' अद्यावत करण्यात आले आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शौचालय दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची सोय, किचनशेड, परसबाग निर्मिती तसेच वृक्षलागवड करण्यात आली.




स्मशानभूमीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाशव्यवस्था, बसण्यासाठी सिमेंट बेंच, रंगरंगोटी व वृक्षलागवड करून परिसर सुशोभित करण्यात आला. ग्रामपंचायत व आरोग्य उपकेंद्राच्या वतीने विविध आरोग्य शिबिरे घेण्यात आली. गावातील ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा, धार्मिक स्थळे तसेच अंतर्गत सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

शासकीय इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंगची कामे करण्यात आली असून गावात नियमित करवसुलीही केली जात आहे. लोकसहभागातून श्रमदान करून वनराई बंधारा उभारण्यात आला असून त्यामुळे जलसंधारणाला मोठी चालना मिळाली आहे.

या यशस्वी अभियानासाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष तसेच ग्रामपंचायत कोलंबीचे कर्तव्यदक्ष ग्राम विकास अधिकारी तुकाराम गोविंद

राव पाटील रातोळीकर, ग्रामपंचायती मधील ईतर कर्मचारी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कोलंबीत प्रभावीपणे राबविले जात असून गावाचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.

# आई-वडिलांच्या हस्ते दालनाची फित कापुन नगराध्यक्षपदाच्या कामाला सुरुवात

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ७ जानेवारी-**

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत लोहा नगराध्यक्ष शरद पवार यांचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला खुर्चीवर बसण्यापुर्वी आई, वडील यांच्या हस्ते नगराध्यक्ष दालनाची फित कापुन कामाला सुरुवात केली.

पदग्रहण सोहळा पार पडण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन , जुना लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज,याच्या पुतळ्यास अभिषेक करण्यात आले त्यानंतर वाजतगाजत फटाक्यांची आतिषबाजी फुलांची उधळण



करत करत मुख्य रस्त्याने घोड्यावर बसून भव्य दिव्य मिरवणूक नगर पालिकेत आगमन होताच

महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले यावेळी नांदेड शहर जिल्हाध्यक्ष माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाशराव घाटे, माजी आमदार सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, संघटन चिटणीस मुक्तेश्वर धोंडगे, प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, मुख्य अधिकारी श्रीकांत लाळगे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, माणिकराव मुकादम, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम छत्रपती धुतमल दत्ता वाले, मन्नान चौधरी गणेशराव सावळे, कंधार माजी नगराध्यक्ष , स्वप्निल पाटील लुंगारे, माजी जि प सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, आनंदराव पाटील शिंदे, किशनराव डफडे,माजी सभापती आनंदराव शिंदे ,, खुशाल पाटील पांगरीकर, शंकरराव ढगे परमेश्वर मुरकुटे, मारुती एजगे ,रमेश माळी अर्जुन राठोड, चंद्रमुनी मस्के, केशवराव मुकदम, गटनेते भास्करर पवार यांच्यासह सर्व नगरसेवक यांची उपस्थिती होती

नवनिर्वाचित शरद पाटील पवार यांनी .प्रास्ताविकपर भाषा केले सर्वसामान्याचा कार्येकर्ता म्हणुन काम करणार आहे. शहर स्वच्छ, सुंदर,हारीत करण्याचा संकल्प केला आभार नगरसेवक तुकाराम दाढेल यांनी केले

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड.
Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439